दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | सोमवार,दि.२६ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२८१वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



# बीडचे जेल म्हणजे वाल्मिक कराडसाठी स्वर्ग

वाल्मिक कराडला व्हीआयपी ट्रीटमेंट | तो दुस-या कैद्यांच्या नावाने कॅन्टीन घेतो | बीड कारागृहाचा प्रश्न पून्हा आला चर्चेत!



## तुरुंगातून बाहेर येताच रणजित कासलेचा आरोप

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:निलंबित पीएसआय रणजित कासले याला पोलिसांनी अटक केली होती. सुरुवातीला त्याला बीड तुरुंगात ठेवले होते. पुढे सुरक्षेच्या कारणास्तव त्याला संभाजीनगर येथील तुरुंगात हलवण्यात आले.आता कासले हा तुरुंगातून बाहेर आला आहे. त्यानंतर त्याने व्हीडीओ करत बीडच्या जेलमध्ये वाल्मिक कराडला व्हीआयपी ट्रीटमेंट मिळत असल्याचा दावा केला आहे.

कासले म्हणाला, ‘मी बीडच्या तुरुंगात गेलो तर पाहिले की खास कपात वाल्मिक कराडला चहा दिला जातो. बाकीच्यांना प्लास्टिकचे कप आहेत. वाल्मिक कराडला पांघरण्यासाठी सहा ब्लँकेट दिले आहेत. त्या ब्लँकेटची गादी करून तो त्यावर आराम करतो. रोज त्याला वाचण्यासाठी सहा सहा पेपर आहेत. खायला चिकन मिळते. वाल्मिक कराडसाठी बीड जेल म्हणजे स्वर्ग आहे.कासले म्हणाला की, ‘मी जेव्हा जेलमध्ये गेलो तेव्हा विचारले की वाल्मिक कराड कुठे आहे. तर मला काही जणांनी दाखवले कराडची बराक कोणती आहे. साडेचार वाजता कराडसाठी चहा आला.बाकीच्यांना प्लास्टिकच्या कपातून तर कराडसाठी नवीन कपातून चहा दिला जात होता. त्याला तीन लेअरच्या तेल लावलेल्या चपात्या देखील मिळत होत्या. बाकीच्यांना एक हजाराची कॅन्टीन मिळत नाही. मात्र, कराडला २५-५० हजारांची कॅन्टीन मिळते. तो दुस-या कैद्यांच्या नावाने कॅन्टीन घेतो. त्यांची नावे देखील मी सांगू शकतो.

### सुरक्षिततेच्या कारणा आडून

बीड जेलमध्ये मी जाताच वाल्मिक कराडने तिथल्या तुरुंग अधिका-यांना बोलावून रणजित कासलेला येथून हलवा असे सांगितले. त्यामुळे सुरक्षेचे कारण देत मला संभाजीनगरच्या जेलमध्ये हलवण्यात आले, असे रणजित कासले याने सांगितले. मी जेलमध्ये असताना माझ्यावर कोणता हल्ला होणार होता त्यामुळे मला हलवण्यात आले, असा प्रश्न देखील कासले याने केला आहे.

### वाल्मिकला नागपूरच्या जेलमध्ये न्या

कासले म्हणाला, बीडचा तुरुंग हा वाल्मिक कराडसाठी स्वर्ग आहे. धनंजय मुंडेंनी त्याला शब्द दिलाय की केस चार-पाच वर्षे चालेल त्यामुळे तुला बीडच्याच जेलमध्ये ठेवू. त्यामुळे मराठा बांधवांनी मागणी करावी की वाल्मिक कराडला नागपूरच्या, संभाजीनगरच्या किंवा कोल्हापूरच्या जेलमध्ये हलवावे. मी देखील अर्ज केला होती की त्याला दुसरीकडे हलवा.

# पक्ष संघटन मजबूत करा, बळ देण्याचे काम करेल!

संजयजी शिरसाट:बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शिवसेना पक्षात कधी जात पाहून काम केलं जात नाही व शिवसैनिक कधीच जात धर्म बघून जनतेचा कामासाठी पुढे जात नाहीत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांचे संस्कार आपल्यावर झालेले आहेत. तसेच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब यांची स्वाभिमानी विचारधारा घेऊन आपण सर्व शिवसैनिक पुढे वाटचाल करत आहोत. त्यामुळे शिवसैनिकांनी जात-धर्म न बघता केवळ माणूस बघून सर्व सामान्य जनतेचे काम करा, जनतेच्या मनावर तुम्ही अधिराज्य गाजवाल आणि जनता तुम्हाला डोक्यावर घेऊन मिरवेल. तुम्ही पक्ष संघटन मजबूत करा तुम्हाला बळ देण्याचे काम मी करेल. असे महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते संजयजी शिरसाट साहेब यांनी बीड जिल्हा शिवसेनेच्या आढावा बैठकीमध्ये शिवसैनिकांना संबोधित केले. तसेच उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत स्थानिक स्वराज्य निवडणुकांबाबत दिशा स्पष्ट केली. काल दि. २४ रोजी दुपारी २ : ०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते मा. ना. श्री. संजयजी शिरसाठ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेनेची अत्यंत महत्वपूर्ण आढावा बैठक मोठया उत्साहात संपन्न झाली. ही बैठक म्हणजे बीड जिल्ह्यात शिवसेना संघटनेच्या मजबुतीचा ठोस पुरावा ठरली. या बैठकीमध्ये » पान २ वर

# स्मृतीशेष ईश्वर कागदेंच्या स्मरणार्थ गौरव

उपक्रम:कर्तुत्ववान व्यक्तींचा केला यथोचित सन्मान



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची लढाई कागदे परिवार लढत आहे. दलित पँथरपासून सुरु झालेला नामांतर चववळीचा इतिहास व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षीत असलेला समाज या बाबात विस्तृत मार्गदर्शन करुन कागदे परिवाराची या सामाजिक समतेच्या वैचारिक लढाईत मोलाचे योगदान देत आहे. स्मृतीशेष ईश्वरजी कागदे यांच्या स्मरणार्थ प्राचार्य कमलाकर कांबळे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. सिद्धार्थ नगर बौद्ध विहार येथे पार पडलेल्या कार्यक्रमास शहरातील विविध मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थितीती होती. कार्यक्रमाची सुरुवात भगवान तथागत गौतम बुद्ध, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्मृतीशेष ईश्वरजी कागदे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी आपल्या विचारमंथनातून उपस्थितांना विचारांनी उजळून टाकले.

पुढे बोलतांना ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे म्हणाले, कागदे कुटुंब हे स्मरणातच नव्हे तर कृतीतून आंबेडकरी विचारांची मशाल पुढे नेत आहे. दलित पँथरच्या चळवळीपासून ते नामांतर लढ्यापर्यंतचा इतिहास हा केवळ संघर्षाचा नव्हे, तर समाजजागृतीचा आहे. कागदे कुटुंब त्या लढ्याचे आजचे वैचारिक शिलेदार आहेत असे ते म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जो समतेचा, न्यायाचा, बंधुत्वाचा आणि परिवर्तनाचा विचार भारताला दिला, त्या विचारांची मशाल आजही अनेक कार्यकर्ते आपल्या छातीशी कवटाळून चालत आहेत. त्या वैचारिक दीपशिखेला नवा उजाळा देणारा आणि समाजासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणारा ‘स्मृतीशेष ईश्वरजी कागदे समाजभूषण पुरस्कार’ सोहळा परळी शहरातील सिद्धार्थ नगर येथील बौद्ध विहारात अत्यंत प्रेरणादायी वातावरणात पार पडला.या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे यांच्यासह डॉ. राजेश इंगोले (मानसोपचारतज्ज्ञ) यांना ‘समाजभूषण’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भावनाविवश होत डॉ. इंगोले म्हणाले, मी आजवर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त केले. पण माझ्या समाजाने दिलेला हा ‘समाजभूषण’ पुरस्कार हा माझ्यासाठी सर्वोच्च आहे. याचे मोल » पान २ वर

# कड्याचा तात्पुरता पूल गेला वाहून

गैरसोय: डागडुजी केली पण उपयोग झाला नाही

पुण्यभूमी प्रतिनिधी



कडा:येथील नगर - बीड मार्गावर नवीन पुलाचे काम चालू असल्याने नळ्या टाकून तात्पुरता तयार केलेला पूल पावसामुळे शनिवारी खचला, त्यामुळे दुरुस्तीसाठी वाहतूक अन्य मार्गांनी सुरुळीत केली. मात्र रविवारी ठोक्या पाऊस झाल्याने गुत्तेदाराने डागडूज्ञी केलेला पूल शेरीच्या नदीला पूर आल्याने पुन्हा एकदा वाहून गेला. त्यामुळे दुसऱ्या दिवशी पुन्हा वाहतुकीचा खोळंबा झाला आहे.

आष्टी तालुक्यातून जाणाऱ्या नगर- बीड महामार्ग चौपदरीकरणाचे काम मागील अडीच वर्षापासून गुत्तेदार अन महामार्ग अधिकाऱ्यांच्या मनमानीपणामुळे आधुनिक यंत्र सामुग्री असूनही अत्यंत संथ गतीने चालू आहे. या मार्गावरील एकाही पुलाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही, तसेच या रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत रखडलेले आहे. पावसाळ्याच्या पूर्वसंध्येला मे महिन्यातच धुवाधार पावसाने हजेरी लावल्याने एक दिवसापूर्वीच खचलेला पूल शनिवारी डागडूज्ञी करून दुरुस्त » पान २ वर

# जिवाचीवाडीत ५० डॉक्टर २५ शिक्षक !

यशोगाथा: गावाने राज्यात आदर्श निर्माण केला



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज तालुक्यातील जिवाचीवाडी या डोंगरी भागात मोडणाऱ्या गावात उत्पन्नाचे कुठल्याही प्रकारचे साधन नसून बहुतांश नागरिक है ऊसतोडणी करून कुटुंबांची गुजराण करतात. पण आपण केलेले काम मुलांनी करू नये, यासाठी त्यांनी मुलांच्या शिक्षणात खंड पडू दिला नसल्याने या गावातून ५० डॉक्टरांसह अभियंते, शिक्षक, सैनिक, पोलिस बनले असून या गावाची डॉक्टरांचे गाव म्हणून तालुक्यात ओळख झाली आहे. डोंगरपट्ट्यातील जिवाचीवाडी हे गाव पाच वस्त्यांमध्ये विभागलेले आहे. शेकडो कुटुंबे ही डोंगरदऱ्यात वास्तव्यास आहेत. पायथ्याशी एक साठवण तलाव असून जमीन ही डोंगराळ आणि मुरमाड आहे. त्यामुळे या जमिनीत बाजरी, पिवळी, हुलगे, मूग ही » पान २ वर

# मुलीसाठी माहेरचा दरवाजा कायम उघडा ठेवा

शामसुंदर महाराज सोन्नरः अहिल्यादेवी होळकर त्रिजन्म शताब्दी कीर्तन महोत्सव

पुण्यभूमी प्रतिनिधी



सिरसाळा:स्रियांना योग्य संधी व स्वातंत्र्य मिळालं की त्या आपलं कर्तृत्व सिद्ध करतात. म्हणून मुलींच्या लग्नाची घाई न करता त्यांना ज्या क्षेत्रात शिक्षण, करियर करायचे असेल ते करू द्या. त्या नक्कीच यश मिळवतील असा विश्वास हभप शामसुंदर महाराज सोन्नर यांनी व्यक्त केला. मुलगी हे परक्याचं धन आहे ही भावना डोक्यातून काढून टाका आणि तिच्यासाठी माहेरचा दरवाजा कायम उघडा ठेवा, असे आवाहनही त्यांनी सिरसाळा येथे केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्म शताब्दीनिमित्त सिरसाळा येथे शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या मार्गदर्शनाखाली कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याची सांगता शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. त्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ. हरिश्चंद्र वंगे, प्रभाकर वाघमोडे, माऊली गडदे, एड. अजय बुरांडे, भीमराव सातपुते, बाबुराव रुपनर,सुभाष सोळंके आदी मान्यवर उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते बंडू खांडेकर यांनी बहारदार सूत्र संचालन केले. तर सतीश काळे यांनी आभार मानले. यावेळी बोलताना शामसुंदर महाराज सोन्नर पुढे म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी सर्व जात-धर्मातील » पान २ वर

### वारकरी रिंगण अन् मोटारसायकल रॅली

अहिल्यादेवी होळकर त्रिजन्म शताब्दीनिमित्त आयोजित केलेल्या कीर्तन महोत्सवाच्या समारोपानिमित्त सिरसाळा येथे मोटार सायकल रॅली आणि दिंडीचे आयोजन केले होते. दिंडी दरम्यान केलेल्या गोल रिंगणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रिंगणात तरुण कार्यकर्त्यांनी ताल धरला होता. हा आनंद डीजे पेशा किती तरी जास्त असल्याच्या भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.

## १४० गावातील शेतकऱ्यांचा टाहो | तांदळा येथील उपोषणाला उत्स्फूर्त पाठिंबा

# विमानतळ नको, जायकवाडीचे पाणी द्या

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील १४० गावातील शेतकऱ्यांनी जायकवाडीच्या पाण्यासाठी लोकलढा उभारला असून या लोकलढा आंदोलनातून एक चळवळ निर्माण झाली आहे. जायकवाडीच्या पाण्यासाठी मौजे तांदळा ता.गेवराई येथे अजय पाटील साळुंखे आमरण उपोषणाला बसले असून दुष्काळी भागातील १४० गावातून उत्सुर्त प्रतिसाद मिळत आहे. अजितदादा कामाचा माणूस आहे, दादा आम्हाला विमानतळ नको तर जायकवाडीचे पाणी द्या, अशी मागणी अंदोलकांकडून करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर अजय पाटील साळुंखे यांनी तांदळा येथे आमरण उपोषण सुरु केले आहे. यात प्रामुख्याने जायकवाडी धरणातून पाणी लिफ्ट करुन भगवान गडाच्या पायथ्याशी शिंगारवाडी फाट्याजवळ टाकण्यात यावे, राष्ट्रीय महामार्ग लगत कालवा करुन तांदळा, कोळगाव, मादळमोही, पाडळशिंगी, पाचेगाव, मार्गे कालवा तयार करावा, तसेच सिंदफना नदी पात्रात पाणी सोडावे, याचा फायदा १४० पेक्षा अधिक गावातील शेतकऱ्यांना होणार असून गेवराई, » पान २ वर



### लढा न्याय हक्काचा: अजय पाटील साळुंखे

१४० गावातील शेतकऱ्यांनी जायकवाडीच्या पाण्यासाठी लोकलढा उभारला असून उपोषणकर्ते अजय पाटील साळुंखे म्हणाले की,१४० गावातील शेतकऱ्यांनी न्याय व हक्क मिळवून दिल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही.

### पाण्यासाठी शेवटपर्यंत संघर्ष करू- गुळवे

शिरूरपासून माजलगावपर्यंतचे शेतकरी हक्काच्या पाण्यापासून वंचित आहेत. या शेतर्यांच्या शेतीला बारमाही व जायकवाडीचे पाणी मिळणे गरजेचे आहे. हे पाणी जो पर्यंत शेतीला मिळणार नाही, तो पर्यंत संघर्ष करू असे प्रतिपादन यावेळी लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे यांनी केले.

# महाराष्ट्र महा गौरव पुरस्काराने सन्मान

अभिनंदनिय:शिवराम घोडकेच्या कार्याची दखल



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:प्रगतशील शेतकरी, सेंद्रिय व नैसर्गिक शेतीचा प्रचार प्रसार करणारे तसेच महाराष्ट्र शासनाचा कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शिवराम घोडके यांचा पुण्यात राज्याचे तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते महाराष्ट्र महा गौरव पुरस्कार देवून समान्मानित करण्यात आले. यावेळी ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, आयुष्यमान भारत महाराष्ट्र समिती अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कृषिभूषण शिवराम घोडके यांना कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल » पान २ वर

# बीड जिल्हा



## दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांना मोफत साहित्य वाटप

**डोंबिवली :** कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या सौजन्याने आणि भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (ॲलिम्को) तर्फे दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना मोफत साहित्य वाटप व तपासणी शिबिरांचे आयोजन शिवसेना डोंबिवली शहर शाखेत करण्यात आले होते. सदर शिबिर आज -उद्यासाठी भरवण्यात आले आहे. त्यांचे औपचारिक उद्घाटन शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांनी केले. त्यावेळी शिवसेना ग्रामीण प्रमुख महेश पाटील, लताताई पाटील, महिला आघाडी जिल्हा संघटक, संजय पावशे, माजी परिवहन सभापतींसह शिवसेना पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या इ. उपस्थित होते. आरव्हीवाय योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना व्हिलचेअर, कुबड्या, काठी, श्रवणयंत्र, गुडघा ड्रेस आदी उपयुक्त साहित्य वाटप करण्यात आले.

# घोडबंदर भागात पाणी तुंबण्याची धास्ती

### ठाणे महापालिकेचे पथक सज्ज; अधिकाऱ्यांचे लक्ष

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

ठाणे महापालिका क्षेत्रातून मुंबई-नाशिक आणि घोडबंदर मार्गे वसई गुजरातच्या दिशेने महामार्ग जात आहे. त्यामुळे या मार्गावरून हलक्या वाहनांसह अवजड वाहनांचीदेखील वर्दळ सुरू असते. तसेच घोडबंदर भागात मोठ्या प्रमाणात एमएमआरडीए, एमएसआरडीसी, मेट्रो आणि सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे सुरू आहेत. ही कामे करताना ड्रेनेज लाइन व कल्व्हर्ट बदलण्यात आले आहे. त्यामुळे यंदा घोडबंदर रोड पाण्याखाली जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. याची धास्ती घेत पालिका प्रशासनाने कापूरबावडी ते गायमुखपर्यंतच्या दोन्ही मार्गिकांवर पाणी साचू नये, यावर लक्ष ठेवण्यासाठी पालिकेच्या सात अभियंत्यांची नेमणूक केल्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी काढले आहेत. तसेच पावसाळ्यात कर्तव्यात कसूर केल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशारादेखील पालिका प्रशासनाने दिला आहे.

त्याचप्रमाणे उड्डाणपुलावर जड व अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. त्यामुळे येथील रस्ते, उड्डाणपूल वारंवार नादुरुस्त होतात. त्यामुळे वाहतूक कोंडीतही भर पडत असते, अशा वेळेस अपघात देखील होण्याची शक्यता असते. घोडबंदर भागात सध्या सेवा रस्त्याचे मुख्य रस्त्यात विलीनीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामामध्ये अनेक ठिकाणी मुख्य रस्ता व सेवा रस्त्यामधील स्टॉर्म वॉटर ड्रेन तोडण्यात आल्याचा दावा महापालिकेने केला.

रस्त्याच्या सीमारेषेवर नवीन स्टॉर्म वॉटर ड्रेनचे बांधकाम करण्यात येत आहे, परंतु अस्तित्वातील स्टॉर्म वॉटर ड्रेन व नवीन स्टॉर्म वॉटर ड्रेन जोडलेले नाहीत. त्यामुळे पावसाळ्यादरम्यान पाण्याचा निचरा होणार नसल्याचेदेखील पालिकेचे म्हणणे आहे. त्यामुळे घोडबंदर रस्त्यावर पाणीचा पाणी साचण्याची शक्यता नाकारता येत नाही. याची दक्षता घेत, पालिका प्रशासनाने कापूरबावडी ते गायमुखपर्यंतच्या दोन्ही मार्गिकांवर पाणी साचू नये, यावर लक्ष ठेवण्यासाठी पालिकेच्या सात अभियंत्यांची नेमणूक केली आहे.



**उपअभियंता व कनिष्ठ अभियंतावर रस्त्याची जबाबदारी**

- कापूरबावडी ते पातळीपाडा फ्लायओव्हर (दोन्ही बाजू)च्या ३.४० किमी अंतराच्या रस्त्यावर पाणी साचू नये, यासाठी त्याची जबाबदारी दत्ता शिंदे, प्रशांत कलगुटकर यांच्याकडे देण्यात आली आहे.
- पातलीपाडा फ्लायओव्हर ते ओवला नाका (दोन्ही बाजू) ३.५० किमी अंतर रस्त्याची जबाबदारी किशोर गोळे, प्रवीण करडी यांच्याकडे आहे.
- ओवळा नाका ते गायमुख (दोन्ही बाजू) ३.०० च्या रस्त्याची जबाबदारी विजय भोई, निशांत पवार आणि शशिकांत भोईर यांच्याकडे आहे.

### महावितरणाच्या चार कार्यालयांची बाजी

# कार्यालयीन सुधारणा मोहिमेचा दुसरा टप्पा

◆ कल्याण (प्रतिनिधी) :



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध दहा विषयांवर शंभर दिवसांचा राज्यस्तरीय कार्यालयीन सुधारणा कार्यक्रम घोषित केला होता. दुसऱ्या टप्प्यातील निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यात महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभाग कार्यालयाने बाजी मारली आहे. कल्याणस्थित कोकण प्रादेशिक विभाग कार्यालयाला द्वितीय, कल्याण परिमंडल कार्यालयास तृतीय तर कल्याण मंडल-१ कार्यालयास प्रथम आणि अहिल्यानगर मंडल कार्यालयास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक जाहीर झाले आहे. कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी सर्व पुरस्कारप्राप्त कार्यालयांच्या प्रमुखांचे अभिनंदन केले आहे.

मुख्यमंत्र्यांनी शंभर दिवसांचा कार्यालयीन सुधारणा कार्यक्रम सुरू केला होता. हा उपक्रम राज्यातील सर्व ३५८ तालुक्यातील दहा हजार शासकीय कार्यालयांमध्ये राबविण्यात आला. सर्व शासकीय विभागांच्या प्रत्येक महसुली विभागातील प्रादेशिक, जिल्हा व तालुका स्तरावरील उत्कृष्ट तीन कार्यालयांची नुकतीच घोषणा करण्यात आली. महावितरणाच्या कोकण प्रादेशिक विभागाने प्रादेशिक पातळीवरील द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर जिल्हा स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत कल्याण मंडल-१ कार्यालयाने प्रथम क्रमांकाला गवसणी घातली आहे. सोबतच नाशिक महसूल विभागात जिल्हा स्तरावर अहिल्यानगर मंडल कार्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेसाठी वेबसाइट सुधारणा, कार्यालयीन सोयीसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर आदी निकष होते. गेले शंभर दिवस या कार्यालयांनी ठरलेल्या निकषांवर किती काम केले, त्यावरून निकाल घोषित करण्यात आला आहे. यात महावितरणच्या बहुतांश कार्यालयांनी सरस कामगिरी करत या स्पर्धेत सर्वच निकषांवर आघाडी घेत पारितोषिकांना गवसणी घातली.

## वेचक

### पर्यावरणाचा उत्सव होणार साजरा

**कल्याण :** जागतिक पर्यावरण दिन २०२५ च्या आनुषंगाने कल्याण, डोंबिवली महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली एका बैठकीचे आयोजन करण्यात




आले होते. दरवर्षी ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी या कार्यक्रमासाठी 'जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन' ही थीम जाहीर केलेली आहे. या पार्श्वभूमीवर, पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय यांनी ५ जून २०२५ पर्यंत देशभरात जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. ही मोहीम वेगवेगळ्या अभिनव पद्धतीने राबविण्यात येणार असून यामध्ये प्रत्येक महिन्यात, त्या-त्या महिन्याच्या संकल्पनेस अनुरूप उपक्रम राबविण्याचे नियोजन करावे असे निर्देश त्यांनी या बैठकीत दिले. शैक्षणिक व पर्यावरणीय दोन्ही दृष्टिकोनातून उपयुक्त ठरेल असे 'Seed Bank' प्रदर्शन सार्वजनिक ठिकाणी लावण्याची संकल्पना देखील या बैठकीत उपस्थितांतर्फे मांडण्यात आली.

### रेल्वे फास्ट फूडला मुरबाडकरांची पसंती

**मुरबाड :** तालुक्यातील शिवळे येथील स्नेहल मलबारी या तरुणाने रस्त्यावर धावणारी रेल्वे बनविल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. नोकरी मिळत नसल्याने याच रेल्वेत फास्ट फूडचा व्यवसाय सुरू केल्याने खवय्यांची झुंबड होते. शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याने व्यवसाय करायचा पण तो अगळा-वेगळा असा निश्चय करून त्यांने दोन डबे व एक रेल्वे इंजिन बनवण्याचा निर्णय घेतला. ही ईच्छा त्याने आपले वडील नंदकिशोर मलबारी, काका विनायक मलबारी यांना सांगितली. वेगवेगळ्या मशनरी बनविण्याची आवड असल्याने वडिलांनी मुलाची इच्छा पूर्ण करण्याची निर्णय घेऊन मार्च २०२४ मुरबाड तालुक्यातील शिवळे येथे या कामाला सुरूवात केली. कोणतीही यंत्रसामुग्री नसताना हार न मानता अडचणीवर मात करीत एक वर्ष परिश्रम करून एक इंजिन व दोन डबे बनविण्यात यशस्वी झाले.

### ठाणे परिवहन कार्यालय राज्यात प्रथम

**ठाणे :** सरकारी कार्यालय म्हटलं की काम लवकर होईल याची फारशी अपेक्षा नसते. मात्र, या समजाला छेद देत ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने एक आदर्श निर्माण केला आहे. महाराष्ट्र




शासनाने राबविलेल्या '१०० दिवसांचे कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम' अंतर्गत, राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये ठाणे कार्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. २३ मे २०२५ रोजी जाहीर झालेल्या विभागीय स्तरावरील कार्यालयांच्या कामगिरीत ठाणे कार्यालयाने उत्कृष्टतेचा मान मिळवला आहे. ठाणे कार्यालयाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संकल्पनेतून कार्यालयाचा कायापालट झाला असून, यामध्ये प्रामुख्याने प्रत्येक खिडकीवर संबंधित ऑनलाइन व फेसलेस कामकाजासाठी QR कोड लावण्यात आले आहेत. 'आपले सरकार' व 'पीजी पोर्टल'वरील तक्रारी वेळेत सोडवल्या जात असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी दिली. जानेवारी २०२५ मध्ये पार पडलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्यानंतर, ही आणखी एक सन्मानाची नोंद ठाणे कार्यालयाच्या नावलौकिकात भर घालणारी ठरली आहे.

### खरीप हंगामासाठी भरारी पथके सक्रिय

**ठाणे :** खरीप हंगाम हा भारतातील मुख्य शेती हंगामांपैकी एक असून, तो मुख्यत्वे पावसाळ्याच्या काळात म्हणजेच जून ते ऑक्टोबर या कालावधीत असतो. या हंगामात शेतीसाठी आवश्यक असलेल्या निविष्ठांची, यंत्रसामग्रीची आणि मजुरांची योग्य तयारी करणे अत्यंत गरजेचे असते. त्यानुसार मेच्या शेवटच्या आठवड्यापासून खरीप हंगामाची तयारी करण्यास सुरूवात होते. ही तयारी सुरू होताच ठाणे जिल्ह्यात रासायनिक खते आणि बी-बियाण्यांचा पुरवठा वेगाने सुरू झाला आहे. या सोबतच या निविष्ठांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी कृषी विभागाने विशेष पावले उचलली असून, जिल्हा स्तरावर एक आणि तालुका स्तरावर पाच अशा एकूण सहा भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. निविष्ठांची काटेकोर तपासणी, शेतकऱ्यांच्या तक्रारींचे त्वरित निवारण आणि बेकायदेशीर विक्रीवर नियंत्रण ठेवण्याचे काम ही पथके करणार असल्याची माहिती जिल्हा कृषी विभागाकडून देण्यात आली आहे. या हंगामासाठी शासनस्तरावर शेतकऱ्यांना रासायनिक खते, बी-बियाण्यांचे वाट तसेच ट्रॅक्टर, नांगर, पेरणी यंत्र, फवारणी यंत्र आदी कृषी यंत्रांवर शासन ५० ते ८० टक्केपर्यंत अनुदान अशा विविध स्वरुपाची मदत केली जाते.

## सुशोभीकरण केलेले चौक 'भकास'

**ठाणे :** ठाणे शहरात विविध भागात सुशोभीकरण करण्यासाठी शहरातील पदपथावर विविध प्रतिकृती उभारण्यात आल्या होत्या. घोडबंदर भागात बसथांब्याजवळ किंवा बसथांब्याच्या जागेत रिक्षा, बसगाड्यांच्या आकाराच्या प्रतिकृती, वेलींचे छत उभारण्यात आले होते. लोकमान्य नगर, सावरकरनगर भागातही मोठ्या प्रतिकृती उभारण्यात आल्या होत्या. परंतु प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या प्रतिकृती भकास झाल्या आहेत. तसेच रिक्षा, बसगाड्या तुटलेल्या अवस्थेत असून काही ठिकाणी गर्दुल्ल्यांचा हा अड्डा झाला आहे. या सर्व प्रतिकृती धुळ खात पदपथावर उभ्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांना देखील अडचण ठरत आहे. त्यामुळे असे सुशोभीकरण कशासाठी असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. रिक्षाच्या प्रतिकृतीतील आतील भाग पूर्णपणे खराब झाले आहे.

## उल्हासनगर येथील कारखान्याला भीषण आग



◆ उल्हासनगर (वार्ताहर) :

उल्हासनगर शहराच्या वेशीवर असलेल्या रेजंसी एंटिलीया या भव्य गृहसंकुलाला लागून असलेल्या एका कारखान्याला काल भीषण आग लागली. येथे फायबरपासून बनवल्या जाणाऱ्या वस्तूंचे मॉडेल बनवले जात असल्याची प्राथमिक माहिती स्थानिकांनी दिली आहे. उल्हासनगर महापालिकेच्या अग्नीशमन दलाच्या जवानांकडून ही आग विझवण्याचा प्रयत्न सुरू होता.

उल्हासनगर शहराच्या वेशीवर कल्याण अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर अनेक मोठमोठी गृहसंकुले उभी राहिली आहेत. उल्हासनगर शहरात जागेचा प्रश्न मोठा असल्याने शहराच्या वेशीवर असलेल्या जागांवर आता मोठ्या इमारती उभारण्यात आल्या आहेत. काल सकाळी या ठिकाणी आग लागल्यानंतर धुराचे मोठे लोट आकाशात दिसत होते. वरप, कांबा या गावांपर्यंत या धुराचे लोट पहायला मिळाले. मात्र फायबरचे कापण्यात आलेले तुकडे आणि कचरा असल्याने धुराचे प्रमाण अधिक होते, अशी माहिती अग्नीशमन दलाच्या वतीने देण्यात आली आहे. ही आग कशामुळे लागले याचे कारण समजू शकले नाही. या आगीमध्ये जीवितहानी झाली नसली तरी कारखाना मालकाचे मात्र मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे बोलले जाते.

# पाकिस्तानचे १२०० अकाऊंट ब्लॉक

◆ कल्याण (प्रतिनिधी) :



प्रत्येकाच्या हातातील मोबाईल क्षणात जगभरातील घडामोडी वापरकर्त्यापर्यंत पोचवतो. याचाच फायदा घेत पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानी सोशल मीडियाच्या माध्यमातून भारत विरोधी अफवा पसरविण्याचा जोरदार प्रयत्न सुरु होता. संपूर्ण भारतीय बनावटीच्या असलेल्या i – ai या ॲपवरून या अफवा पसरवल्यास त्याच्यावर अधिक विश्वास ठेवला जाईल या हेतूने पाकिस्तानातून ॲपवर दिवसभरात १२०० हून अधिक रिक्वेस्ट धाडण्यात आल्या. मात्र नेहमीपेक्षा येणाऱ्या रिक्वेस्ट वाढल्याचे आणि त्यातही याद्वारे भारता विरोधी मेसेज पाठवले जात असल्याचे लक्षात येताच ॲपच्या निर्मात्या डोंबिवलीकर तरुणांनी पाकिस्तानच्या सर्व रिक्वेस्ट फेटाळून ही अकाऊंट ब्लॉक करत व्यवसायापेक्षा देशप्रेमाला महत्व दिले आहे. डोंबिवलीतील कपिल अगरवाल या तरुणाने ओंकार मयेकर आणि ए आय तज्ञ यश कदम यांच्यासह देशभरातील तज्ञ इंजिनिअर्सना एकत्र आणून i-ai हे नवे कोरे ॲप बाजारात आणले असून सोशल मिडीयावरील अनेक प्रचलित ॲपना हे ॲप टक्कर देत आहे. चार महिन्याच्या कालावधीत या ॲपचे १० लाखापेक्षा अधिक सबस्क्राईबर झाले असून इतर ॲपच्या तोडीस तोड माहिती पुरविणारे ॲप लोकांच्या पसंतीस उतरत आहे.

२२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ला झाल्यानंतर पुढील काळात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या काळात सोशल मिडीयाच्या माध्यमातून पाकिस्तानी हॅकरनी सर्वच सोशल मिडिया प्लटफॉर्म वर बनावट अकाऊंट तयार करून त्याद्वारे भारताविरोधी वातावरण तयार करण्याचा प्रयत्न चालवला होता. मात्र याची कुणकुण लागताच अग्रवाल आणि त्यांच्या टीमने त्यांचा हा प्रयत्न हाणून पाडताना आपल्या वापरकर्त्या पर्यंत चुकीची माहिती पोचू नये यासाठी दोन दिवसात १२०० पाकिस्तानी रिक्वेस्ट रिजेक्ट केल्या. देशप्रेमापुढे व्यवसाय कधीही मोठा नाही, देशाबद्दल योग्य अशीच माहिती जगभरात पोचावी चुकीचे समज गैरसमज आपल्या माध्यमातून पसरले जाऊ नयेत, याची काळजी घेऊनच आपण या रिक्वेस्ट फेटाळल्याचे अगरवाल यांनी सांगितले.

### पावसामुळे १६ मृत्यू, १०७ घरांची पडझड

**ठाणे :** जिल्ह्यात गेल्या १५ दिवसांत झालेल्या वादळ वाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसामुळे इमारत दुर्घटना, वीज, झाडे पडून १६ जणांचा मृत्यू झाला आहे. गाय, म्हैस अशी तीन पशुधन दगावली आहेत. तसेच इमारतीसह १०७ घरांची पडझड होऊन नागरिक बेघर झाले. ३०३ शेतकऱ्यांच्या फळबागा, तृणधान्य आणि भाजीपाल्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार गेल्या १५ दिवसांपासून ठाण्यासह मुरबाड, शहापूर, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, उल्हासनगर या तालुक्यांमधील नागरिकांना अवकाळी पावसामुळे विविध समस्यांना तोंड द्यावे लागले. घरांवरील पत्रे व कौले उडून रहिवाशांचे मोठे नुकसान झाले. इमारत कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला. रिक्षावर झाड पडून तीन जणांचा मृत्यू, शहापूरला शॉर्टसर्किटमुळे गॅस सिलिंडरच्या स्फोटात एका व्यक्तीचा तर वीज पडून तीन जणांच्या मृत्यूची नोंद झाली आहे.

## सावित्रीबाई फुले कलामंदिरात फॉल सिलिंगचा भाग कोसळला


◆ डोंबिवली (वार्ताहर) :



कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवलीतील सावित्रीबाई फुले कलामंदिरात गुरुवारी (दि.२२) रोजी रात्रीच्या सुमारास फॉल सिलिंगचा काही भाग अचानक कोसळल्याची घटना घडली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर केडीएमसीच्या अधिकाऱ्यांनी काल सकाळी पाहणी केली. सदर फॉल सिलिंगच्या दुरूस्तीकरिता नाट्यगृह बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असून दुरूस्ती होईपर्यंत रंगकर्मींसह नाट्य रसिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केडीएमसी प्रशासनाने केले आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या उपक्रमातील डोंबिवलीच्या एमआयडीसी फेज १ परिसरात असलेल्या सावित्रीबाई फुले कलामंदिरातील फॉल सिलींगचा भाग गुरुवारी रात्रीच्या सुमारास अचानक कोसळला. सुदैवाने नाट्यगृहात कोणताही कार्यक्रम वा नाट्यप्रयोग सुरू नव्हता. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. हा प्रकार समजल्यानंतर केडीएमसीच्या शहर अभियंता अनिता परदेशी, प्रकल्प विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, कार्यकारी अभियंता मनोज सांगळे यांनी नाट्यगृहाची पाहणी केल्यानंतर स्ट्रक्चरल इंजिनियरला अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. सावित्रीबाई फुले कलामंदिर हे नाट्यगृह सुरू होऊन अठरा वर्षांपेक्षा जास्त कालावधी लोटला आहे. स्ट्रक्चरल इंजिनियरच्या मतानुसार फॉल्स सिलिंगचे फ्रेमिंग गंजलेले आणि कमकुवत झाल्यामुळे नव्याने करणे आवश्यक आहे. त्यामुळे आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले कलामंदिराची तातडीने दुरूस्ती करण्यासाठी सद्यस्थितीत सदर नाट्यगृह काही काळ बंद ठेवण्याकरिता महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी मंजुरी दिली आहे. होणाऱ्या गैरसोयीबाबत रंगकर्मी आणि नाट्य रसिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात आले आहे.

## एमआयडीसीमध्ये भरदिवसा घरफोडी



◆ कल्याण (प्रतिनिधी) :

कल्याण - डोंबिवली एमआयडीसी रहिवासी क्षेत्रातील एका इमारतीतील बंद असलेल्या फ्लॅटमध्ये घरफोडी केल्याची घटना उजेडात आली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एमआयडीसी, सुदामा नगरमधील मॉडेल कॉलेज बस स्टॉप जवळ असलेल्या साईदीप सोसायटी (RH-29) मधील A आणि B विंग मधील दोन बंद फ्लॅटमध्ये चोरट्यांनी येऊन घरफोडी केली आहे. शुक्रवार २३ मे रोजी दुपारी साडेतीनच्या दरम्यान भरदिवसा या घरफोड्या झाल्या. त्यावेळी एका चोरट्याच्या हातात कोयता असल्याचे दिसल्याने नागरिकांत आता घबराट पसरली आहे.

या दोन तरुण चोरट्यांनी A विंग मधील पहिला मजला फ्लॅट क्रमांक ७ (नाव समजले नाही) मध्ये घरफोडी करताना ते सीसी कॅमेऱ्यात कैद झाले असून काही मौल्यवान दागिने, ऐवज व रोख रक्कम चोरीस गेली असल्याचे समजले आहे.

दुसरी घरफोडी B विंग मधील दुसरा मजला फ्लॅट क्रमांक १० मध्ये झाली पण या चोरट्यांना या घरात काही मौल्यवान ऐवज चोरण्यासाठी मिळाला नाही. या घरफोडीची फिर्याद मानपाडा पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. एमआयडीसी निवासी मध्ये गेल्या दोन महिन्यात अनेक घरफोड्या झाल्या असल्याचे रहिवाशांनी पोलिसांना सांगितले असून पोलीस या अज्ञात चोरट्यांचा शोध घेत आहेत.

## १ किलोहून अधिक गांजासह युवक अटकेत

**कल्याण :** टिटवाळा परिसरातील अमली पदार्थ विक्रीच्या वाढत्या घटनांवर लगाम घालण्यासाठी कल्याण तालुका पोलिसांनी मोठी कारवाई करत गांजाच्या साठ्याचा पर्दाफाश केला आहे. दिनांक २३ मे २०२५ रोजी सायंकाळी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली एक पथक आंबेडकर नगर, मांडा, टिटवाळा (प.) येथे रवाना करण्यात आले. सदर ठिकाणी धाड टाकून दिशान दोस्तमोहम्मद खलिफा (वय २८ वर्ष) या इसमास ताब्यात घेण्यात आले. त्याची कसून झडती घेतली असता त्याच्याकडून १ किलो १३१ ग्रॅम इतक्या प्रमाणात गांजा हा अंमली पदार्थ सापडला.

पोलिसांनी सदर गांजा कायदेशीर प्रक्रियेने जप्त केला असून, आरोपीविरोधात एन.डी.पी.एस. (NDPS) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईनंतर आरोपीला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्यास २६ मे २०२५ पर्यंत पोलीस कोठडीचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू असून, आरोपीच्या संपर्कातील इतर व्यक्तींचा शोध घेण्यात येत आहे. पोलिसांनी गोपनीय माहिती संकलन सुरू करून ही कारवाई उभी केली.

### नाले पाहणीदरम्यान जितेंद्र आव्हाड-नजीब मुल्ला आमने-सामने

# राबोडी भागातील नाले कामाच्या चौकशीची मागणी

◆ ठाणे (प्रतिनिधी) :



ठाणे येथील राबोडी भागातील क्रांतीनगर परिसरातील निर्माणधीन नाल्याच्या पाहणीदरम्यान, राष्ट्रवादी पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि राष्ट्रवादी पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष नजीब मुल्ला हे आमने-सामने आले होते. यानंतर हे दोन्ही नेते एकमेकांकडे बघत पुढे निघून गेले. या दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक येथे मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामुळे येथे काहीकाळ तणावाचे वातावरण होते.

ठाणे येथील राबोडी भागातून मोठा नाला जातो आणि तो पुढे खाडीला मिळतो. या नाल्यात इंदिरानगर येथील डोंगर भागातून पाणी येते. या नाल्यावर रस्ता तयार करण्याचे काम सुरू आहे. बुधवारी ठाणे शहरात अवकाळी पाऊस झाला. या पावसादरम्यान, नाल्यात पाणी तुंबले आणि ते क्रांतीनगर, शिवाजीनगर भागातील घरांमध्ये शिरले. राबोडी परिसरातून राष्ट्रवादी पक्षाचे माजी नगरसेवक नजीब मुल्ला हे निवडून येतात. नाल्यातील पाणी घरांमध्ये शिरल्याच्या मुद्द्यावरून त्यांच्यावर टिका केली जात आहे. असे असतानाच, राष्ट्रवादी पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी काल सायंकाळी क्रांतीनगर परिसरात जाऊन नाल्याची पाहणी सुरू केली. पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुहास देसाई हे आव्हाड यांना नाल्याच्या कामामुळे घरांमध्ये पाणी कसे शिरले याची माहिती देत असतानाच, राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक नजीब मुल्ला हे त्यांच्या कार्यकर्त्यांसह तिथे आले. आव्हाड आणि मुल्ला हे दोघे आमने सामने आल्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण होते. त्यानंतर दोघांनी पत्रकारांशी संवाद साधत प्रतिक्रिया नोंदविल्या. इंदीनगर, सावरकरनगर येथील डोंगर भागातून येणारे पाणी हे राबोडी भागातील नाल्यातून पुढे खाडीला जाऊन मिळते. या नाल्याच्या कामात अनेक त्रुटी असल्यामुळे नाल्यात पावसाचे पाणी तुंबून येथील नागरिकांचे नुकसान झाले. त्याची भरपाई पालिका देणार आहे का, अशी विचारणा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली. विकास सर्वांनाच हवा आहे. पण, त्याचा मार्ग भ्रष्टाचाराचा नसावा, असे सांगत या नाल्याच्या कामाची चौकशी करा, अशी त्यांनी सांगितले.

## महावितरणतर्फे 'मल्टी स्टेकहोल्डर वर्कशॉप'

◆ ठाणे (प्रतिनिधी) :




महावितरणच्या औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांसाठी तसेच महाराष्ट्रातील विविध वीज वितरण कंपनी व औद्योगिक संघटनांसाठी आरईसीतर्फे 'मल्टी स्टेकहोल्डर वर्कशॉप' आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेचा उद्देश जगभरातील १८० अर्थव्यवस्थांमधील व्यवसाय आणि गुंतवणूक वातावरणाचा सर्वेक्षण (बी-रेडी सर्वे) करणे आहे, ज्यामध्ये नियामक चौकट, संबंधित सार्वजनिक सेवांच्या तरतूदींवर लक्ष केंद्रित केले जाईल. या कार्यक्रमासाठी सह संचालक, महाराष्ट्र वीज नियामक आयोग, हर्षद पाटील, कार्यकारी संचालक धर्मेंद्र नागपाल, महावितरण भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील, बेस्टचे उप मुख्य अभियंता मंगेश खरोटे, महावितरण ठाणे मंडळाचे अधीक्षक अभियंता युवराज मेश्राम अडाणी पॉवरच्या श्रीमती प्राची बनसोडे व टाटा पॉवरचे तुषार शेठे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आरईसी 'मल्टी स्टेकहोल्डर वर्कशॉप' बाबत माहिती दिली व 'बी रेडी' सर्वेक्षणाचे १० महत्त्वाचे मुद्दे व वीज यामध्ये कशी महत्त्वाची भूमिका बजावते यावर लक्ष केंद्रित केले.

त्यानंतर, आरईसीचे अनुराग सिन्हा यांनी 'बी रेडी' सर्वेक्षणात मुल्यांकन करण्यासाठी ३ महत्त्वाचे स्तंभ म्हणजे वीज नियामक सुविधा, वीज सेवांची गुणवत्ता व पारदर्शकता, प्रत्यक्षात वीज सेवा पुरवठ्याची कार्यक्षमता यावर सविस्तर सादरीकरण केले. त्यानंतर उपस्थित औद्योगिक व व्यावसायिक ग्राहक व औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींसाठी कार्यशाळेशी संबंधित प्रश्नोत्तरांचा सत्र ठेवण्यात आला होता.

# ऑल इज वेल...



ग ल्या वर्षी नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या महायुतीला जनतेने महाप्रचंड बहुमताने निवडून दिले. विधानसभेतील २८८ पैकी २३५ जागांवर महायुतीचे आमदार निवडून आले. भाजपाचे विक्रमी संख्येने १३४ आमदार निवडून आले. सर्वाधिक आमदार असलेल्या पक्षाचे नेते म्हणून देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे दोन उपमुख्यमंत्री असे महाराष्ट्रात ट्रिपल इंजिन सरकार स्थापन झाले. ज्यांना राजकारणात करिअर करायचे आहे, ज्यांना सार्वजनिक जीवनात उमेदीने काम करायचे आहे, ज्यांना जनसेवेसाठी झोकून द्यायचे आहे, ज्यांचा मोदी-शहांच्या भूमिकेवर आणि भाजपाच्या ध्येय-धोरणांवर विश्वास आहे, त्या सर्वांना महायुतीचा दरवाजा खुला आहे, असा संदेश भाजपाने दिलेला आहे. राज्यात डिसेंबर २०२४ मध्ये महायुतीची ०२ कारकीर्द सुरू झाली पण त्यात कुठेही छगन भुजबळ नव्हते. भुजबळांसाठी हा मोठा धक्का होता. महायुतीच्या सरकारमध्ये आपल्याला डावलण्यात आल्याची भावना त्यांनी अनेकदा बोलून दाखवली. पक्षाच्या अंतर्गत राजकारणामुळे भुजबळांना मंत्रीपदापासून दूर राहावे लागले, अशी उघड चर्चा त्यांच्या समर्थकांत होती. अविभाजित शिवसेनेत बंडाचा झेंडा फडकावून शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेसमध्ये गेलेल्या भुजबळांना १९९१ पासून राज्यात सतत कॅबिनेट मंत्री म्हणून स्थान होते. पण महायुती सरकारच्या ०२ मध्ये त्यांना मंत्रालयातील सत्तेच्या कॅरिडॉरपासून वंचित ठेवले गेले. ओबीसी समाजाचा आक्रमक नेता महाराष्ट्रात दुसरा कोणी नाही, असे चित्र भुजबळांच्या समर्थकांनी सातत्याने निर्माण केले. भुजबळांना सरकारमधून वगळणे म्हणजे ओबीसी समाजावर अन्याय आहे असे ते ठसवत राहिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सामोरे जायचे असेल तर महायुतीकडे भुजबळांसारखा नेता असणे गरजेचे आहे, असे महायुतीला विशेषतः भाजपालाही वाटू लागले. मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांच्या मागणीला उघडपणे विरोध करण्याची हिम्मत भुजबळांनी दाखवली. मराठा आरक्षणाला आपला विरोध नाही पण ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये अशी त्यांनी ताठर भूमिका कायम ठेवली. बीडमधील मस्साजोगच्या सरपंचाच्या क्रूर हत्येनंतर चोहोबाजूने जनाक्रोश प्रकट झाल्याने धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाचा राजीनामा देणे भाग पडले आणि त्या दिवसापासून त्यांच्याजागी भुजबळ पुन्हा मंत्री होणार अशा चर्चेला उधाण आले.



स्टेटलाइन
डॉ. सुकृत खांडेकर

अवघ्या सहा महिन्यांत भुजबळांचे सरकारमध्ये पुनरागमन झाले, याचे अनेकांना आश्चर्य वाटले आणि भाजपाच्या चतुर खेळीनेही अनेक जण हबकले. भुजबळांच्या पुनरागमनानंतर नाशिक जिल्ह्यातील अनेक नेत्यांना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील काहींना आपल्या राजकीय भविष्याची काळजी वाटू लागली. भुजबळांना मंत्री करून भाजपाने एक नेम धरून अनेक तीर मारलेत अशीही कुजबूज ऐकायला मिळाली.

सत्त्याहत्तर वर्षांचे छगन भुजबळ यांची महायुतीला मंत्री म्हणून खरंच गरज वाटते आहे का? ज्या भुजबळांवर भाजपाने शंभर कोटींचा घोटाळा झाल्याचे गंभीर आरोप भाजपाने केले होते, जे भुजबळ ईडी व अँटी करप्शनच्या चौकशीच्या जाळ्यात सापडले होते, जे भुजबळ दोन वर्षे जेलमध्ये होते, ते पुन्हा महायुतीच्या सरकारमध्ये येऊन कॅबिनेटमंत्री म्हणून शपथ घेतात हे अनाकलनीय आहे. भुजबळ कोणामुळे जेलमध्ये गेले व कोणामुळे सरकारमध्ये मंत्री म्हणून परत आले? सरकारमध्ये स्वतः देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजितदादा पवार असे ताकदवान नेते आहेत. महायुतीत नेत्यांची फळी व कार्यकर्त्यांची फौज आहे. चंद्रशेखर बावनकुळे, सुनील तटकरेंसारखे संघटक आहेत. एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत रोज कोणीना कोणी नेता अनुयायांसह प्रवेश करीत आहे. तरीही महायुतीला भुजबळांसारखा चेहरा सरकारमध्ये मंत्री म्हणून पाहिजे आहे. यावर्षी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व पंचायत राज समितीच्या निवडणुकांमध्ये मतदारांना आकर्षित करण्यासाठी ताकदवान ओबीसी नेता महायुतीला हवा आहे, हे एकमेव कारण त्यामागे आहे काय? पक्षश्रेष्ठींच्या संमतीशिवाय भुजबळांचा महायुती सरकारमध्ये कोणाचीही मंत्री म्हणून शपथविधी होऊ शकत नाही. त्यामुळे भाजपा श्रेष्ठींनी दिल्लीहून हिरवा कंदील दाखविल्यानंतरच मुंबईतील राजभवनावर राज्यपाल राधाकृष्णन यांनी भुजबळांना कॅबिनेटमंत्री म्हणून शपथ दिली. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या साक्षीने हा शपथविधी सोहळा पार पडला. म्हणूनच भुजबळांना मंत्रीपद देण्यास आम्ही राजी नव्हतो असे कुणालाही उद्या म्हणता येणार नाही. भुजबळांनी भ्रष्टाचाराच्या आरोपावरून दोन वर्षे जेलमध्ये काढली असली तरी त्यांचे निवडणुकीच्या राजकारणातले महत्त्व कायम आहे, हेच त्यांच्या पुनरागमनाने दाखवून दिले आहे.

मुंबईतील भायखळ्याच्या मंडईत भुजबळांचा भाजीपाल्याचा व्यवसाय होता. १९७० मध्ये एक शिवसैनिक म्हणून त्यांनी कामाला सुरुवात केली. त्यावेळी त्यांची शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंवर निष्ठा होती. शिवसेनाप्रमुखांच्या आशीर्वादानेच मुंबई महापालिकेवर नगरसेवक, दोन वेळा महापौर, आमदार झाले. १९९१ मध्ये त्यांनी शिवसेनेत बंड केले व डझनभर आमदारांसह काँग्रेसमध्ये गेले. शरद पवारांचा विश्वास संपादन करून त्यांनी राज्यात मंत्रीपद, उपमुख्यमंत्रीपद मिळवले. १९९९ मध्ये ते काँग्रेस सोडून शरद पवारांबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. जुलै २०२३ मध्ये शरद पवारांचे नेतृत्व सोडून ते अजित पवारांच्या बरोबर गेले. आता त्यांचा ओढा भाजपाकडे दिसतो अशी चर्चा उघड होते आहे. शिवसेनेत बंड करून ते काँग्रेसमध्ये गेले तेव्हा शिवसेनाप्रमुखांनी त्यांची लखोबा अशी संभावना केली होती, नंतर सत्तेत असताना भुजबळांनी शिवसेनाप्रमुखांना एका जुन्या प्रकरणात अटक करून दाखवली होती पण ती अटक न्यायालयात क्षणभरही टिकली नाही.

भुजबळांचा मंत्रीपदाचा शपथविधी झाल्यानंतर नाशिक जिल्ह्यात त्यांच्या अभिनंदनाचे फलक लागले. पण माध्यमात व समाज माध्यमांवर भुजबळांवर कोणी, केव्हा, काय भ्रष्टाचाराचे आरोप केले, याच्याही क्लिप्स व्हायरल झाल्या. भाजपाने दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदन उभारणीत व अन्य काही प्रकरणात भुजबळांवर शंभर कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचे आरोप केले होते. जे आज महायुतीच्या सरकारमध्ये आहेत, त्याच नेत्यांनी भुजबळांवर ते मंत्री असताना सत्तेचा गैरवापर केला, असा आरोप केला होता. भुजबळांना तुरुंगवास झाला तो काही स्वातंत्र्यसैनिक म्हणून नव्हे किंवा जनआंदोलन केले म्हणून नव्हे, तर घोटाळा केला म्हणून तपास यंत्रणांनी त्यांना जेलमध्ये पाठवले होते अशा आरोपांचे त्या वेळचे व्हीडिओ आज सोशल मीडियावर फिरत आहेत. भाजपाच्या बड्या नेत्यांनी भुजबळांसारखे हातवारे करीत त्यांच्या नकलाही जाहीर सभांतून केल्या. एवढेच नव्हे असा नटसम्राट महाराष्ट्रात झाला नाही अशीही त्यांची खिल्ली उडवली होती. दहा वर्षांपूर्वी ज्यांनी विरोध केला तेच आता भुजबळांचा महायुतीला (निवडणुकीत मतांसाठी) कसा उपयोग होईल असे सांगत आहेत. भुजबळांना पुन्हा मंत्री करायला जनतेने विरोध दर्शवला नाही व नव्हता. भुजबळांनी मंत्रीपदाची शपथ घेतली म्हणून महाराष्ट्रात कुणीही रस्त्यावर येऊन निषेध नोंदवला नाही. भुजबळांवर ज्यांनी भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले त्यांनीच त्यांना सरकारमध्ये मंत्री म्हणून घेतले, याचे जनतेला आश्चर्य वाटले. भुजबळांना मंत्रीपद मिळाले, याचा अर्थ त्यांच्यावरील शंभर कोटींच्या घोटाळ्याचा आरोप खोटा होता का? ईडी किंवा अँटी करप्शनने त्यांना क्लीनचिट दिली का? ते जामिनावर आहेत, न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्त केलेले नाही, असे सांगितले जाते, ते खरे आहे का? सत्तेवर नसताना भुजबळ यांनी आपणच ओबीसी समाजाचे तारणहार, रक्षणकर्ते व पालनकर्ते आहोत अशी स्वतःची प्रतिमा निर्माण केली होती. ते केवळ पुन्हा मंत्रीपद मिळविण्यासाठी होते का? भाजपाने गेल्या निवडणूक प्रचारात भुजबळांवर आरोप करून जनतेची सहानुभूती मिळवली. भुजबळ हे खलनायक आहेत, असे चित्र भाजपाने रंगवले होते. आता जनतेने सर्व विसरायचे का? आता भुजबळ एकदम गुणसंपन्न वाटू लागले आहेत. एकदा मान-सन्मान, अधिकार व पद दिले की बाकी सर्व दुय्यम ठरते, हेच यानिमित्ताने महाराष्ट्राला अनुभवायला मिळाले. महाराष्ट्रातील जनतेचा पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आजही मोठा विश्वास आहे. त्यांच्याकडे पाहूनच महाराष्ट्रातील जनता उद्याच्या भविष्याची स्वप्ने पाहत आहे. भुजबळांना सहा महिन्यांपूर्वी डावलण्यात आले तेव्हा ते म्हणाले होते, जहां नही चैना, वहा नही रहना... आणि मंत्रीपदाची शपथ घेतल्यावर ते म्हणाले - ऑल इज वेल, दॅटस एन्ड वेल...

sukritforyou@gmail.com
sukrit@prahaar.co.in

## कहाणी कौसल्येची!

खा नदेशकन्या बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतला एक प्रसंग मला स्तिमित करतो. दारी आलेल्या भविष्य पाहण्याचा दावा करणाऱ्या कुडमुड्या ज्योतिष्याला बहिणाबाई म्हणतात,

बापा नको मारू थापा
असो खऱ्या, असो खोट्या
नाही नशीब नशीब
तयहाताच्या रेघोट्या
नको नको रे ज्योतिषा
नको हात माजा पाहू
माझे दैव मले कये
माझ्या दारी नको येऊ

कवितेत आलेला हा अनुभव बहिणाबाईंच्या आयुष्याशी जोडलेला होता. 'माझे नशीब मला कळते' असे म्हणण्याची ताकद या साध्यासुध्या बाईमध्ये होती. तिच्याशी नाते सांगणाऱ्या ग्रामीण भागातील अनेक स्त्रियांनी आपल्या आत्मसामर्थ्यावर आपले संसार तोलून धरले.

स्वतःची जीवनकथा सांगणे कोणत्याही माणसाला शक्य आहे हा विश्वास मराठीतील 'आत्मकथन' या साहित्यप्रकाराने समाजाला दिला. मुख्य म्हणजे आपली कथा व्यथा सांगणारी अनेक आत्मकथने अनेक स्त्रियांनी मराठीत लिहिली आहेत.



मायभाषा
डॉ. वीणा सानेकर

पुस्तकांवर नि माणसांवर प्रेम करणाऱ्या ८६ वर्षांच्या कौसल्याताई पेटकर यांचे 'कौसल्यायन' माझ्या हाती आले आणि त्या पुस्तकाच्या सरळसाध्या शैलीने मला गुंतवून ठेवले.

या पुस्तकातील लोककला नि लोकगीतांबद्दलचा भाग ग्रामीण शिवार आणि परंपरांची खूप सुंदर ओळख करून देतो. 'बैलपोळा' या सणाचे वर्णन करताना पळसाच्या छोट्या फांद्या एकत्र करून, धाग्याने बांधून हळद तेलाचे मिश्रण करून बैलाचे खांदे शेकले जातात, असा उल्लेख येतो. पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांना' आज आवतन घ्या, उद्या जेवायला या 'असे जेवण्याचे आमंत्रण दिले जाते. बैलांसाठी पोळ्याच्या सणाला म्हटलेल्या गीतांना 'झडत्या' असे म्हटले जाते. वर्तमान काळातील सामाजिक समस्यावर या गीतातून टीका केली जाते. गरिबी, महागाई, भ्रष्टाचार असे विविध विषय व्यंगात्मक शैलीत या गीतांमध्ये गुंफलेले असतात, अशी उदाहरणे कौसल्याताई पुढीलप्रमाणे अगदी सहज देतात.

"पारबतीच्या लुगड्याले छपन्न गाठी
देव कवा धावल गरिबांसाठी"

देवालाच या ओळीत थेट प्रश्न विचारला आहे.

चंद्रपूरमधील 'रामायण' नावाच्या लोककलाप्रकाराचे संदर्भ काळाच्या ओघात लुप्त झालेले असले तरी त्याच्या आठवणी अजून ताज्या आहेत. राजा, त्याच्या दोन राण्या, प्रधान अशी पात्रे या रामायणात असायची. हे लोकरामायण पाहायला घरून गोधडी घेऊन गावकरी जायचे. पूर्वी गावात मनोरंजनाची विशेष साधने नव्हती त्यामुळे रात्री गावकरी या कलेत रमायचे.

आणखी एक गोष्ट गावातील स्त्रियांना जगण्याची उमेद द्यायची. ती गोष्ट म्हणजे गाणी. कौसल्याताईंची अशी धारणा आहे की, गाणे शेतातील कष्ट हलके करते. दळणकांडणातील कंटाळवाणा वेळ सुरम्य करते. घरापासून, आई-बाबा व भावाबहिणीपासून होणारी नवऱ्या मुलीची ताटातूट हलकी करते. बाळाला शांत झोपवण्यासाठी आई अंगाई गाते. प्रत्येकाला काही ना काही दुःख आणि अडचणी असतात, त्या संकटात थोडीफार हळवी झुळूक गाणी घेऊन येतात.

शेतातल्या कामांमध्ये किंवा कठीण प्रसंगांमध्ये गाण्यांनीच विसावा दिला असे म्हणणाऱ्या कौसल्याताई आयुष्याचे गाणे आनंदाने गात आहेत. काळ्या मातीचे वरदान लाभलेल्या ग्रामीण भागातली स्त्री कष्टाला घाबरत नाही. मुलाबाळांमध्ये रमणारी, कुटुंबासाठी जगणारी स्त्री दुःखांना हसत हसत सामोरी जाते. तिच्या आयुष्याची सुफळ संपूर्ण कहाणी अनेक पिढ्यांना प्रेरणा देते.



## भारतातील हुंडाविरोधी चळवळीच्या प्रणेत्या...

हे वर्ष २०२५ आहे. तीन वर्षांपूर्वी आपण स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी केली. १५ दिवसांपूर्वी 'ऑपरेशन सिंदूर' ही मोहीम राबवून पाकिस्तानला धडा शिकवला. या मोहिमेची माहिती सोफिया कुरेशी आणि व्योमिका सिंग या दोन भारतीय महिला सैन्याधिकारी पत्रकार परिषदेत देत. भारताच्या लेकी किती शक्तिशाली आहेत हे जगाने पाहिलं. धाडसी आणि शूरवीर अशा नवीन भारताचा जगभर डंका वाजत असताना १० महिन्यांच्या बाळाची आई हुंडाबळीची शिकार ठरली. वैष्णवी हगवणे हिने सासरच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. सारा देश हादरला. एकीकडे भारतमातेच्या लेकी जगाला धडकी भरवत आहेत आणि दुसरीकडे तिच्या लेकी हुंड्यासारख्या कुप्रथेला बळी पडत आहे. ४० वर्षांपूर्वी या कुप्रथेविरुद्ध अशाच अभागी मुलीची आई न्यायालयीन लढाई लढली. तिच्यामुळे हुंडाविरोधी कायदा निर्माण झाला. ही लढाऊ आई होती सत्यराणी चड्ढा.

दिल्लीच्या लक्ष्मीबाई कॉलेजमधून पदवीधर झालेल्या शशिबालाचे सुभाष चंद्राशी लग्न झाले. तेव्हा शशिबाला अवघ्या २० वर्षांची होती. सुभाषचंद्र बुटासाठी प्रसिद्ध असणाऱ्या बाटा कंपनीचा व्यवस्थापक होता. लग्नाला अवघे १० महिने झाले होते. शशिबाला स्टोव्हचा भडका होऊन लागलेल्या आगीत भाजली आणि मरण पावली. विशेष बाब म्हणजे ती सहा महिन्यांची गर्भवती होती.

शशिबालाच्या सासरचे लोक स्कूटर, टेलिव्हिजन आणि रेफ्रिजरेटर इत्यादी अनेक गोष्टींची मागणी करत होते. सत्यराणीने त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पण ती तसे करू शकली नाही. तिने कसे तरी टीव्ही आणि रेफ्रिजरेटरसाठी पैसे जमा केले होते पण स्कूटरसाठी पैशांची व्यवस्था करू शकली नाही. तिच्या मुलीच्या मृत्यूच्या दोन दिवस आधी जावई सुभाषचंद्र याने सत्यराणीला उर्वरित हुंड्याची (स्कूटर) मागणी पूर्ण न झाल्यास भयानक परिणाम होण्याची धमकी दिली.

शशिबालाने आपल्या अल्पायुषी अशा १० महिन्यांच्या वैवाहिक आयुष्यात आपल्या आईला व माताराणीच्या (देवीच्या) नावे अनेक पत्रे लिहिली. त्यात ती आपल्या आईला एक प्रकारे दिलासा देण्याचा प्रयत्न करत होती की सगळं काही ठीक होईल. तिला हुंड्यावरून जो सासरी जाच होत आहे तसा जाच सुभाषच्या बहिणींना होऊ नये अशी तिची इच्छा होती. हुंडा घेणे व देणे हा १९६० पासून कायदेशीर गुन्हा होता. मात्र हुंडा देणे व घेणे ही सामाजिक प्रथा होती, जी सर्वमान्य होती. आपल्या मुलाला रोख रक्कम, दागिने, गाडी, भांडी, कपडे काही वेळेस तर घर, जमीन हुंड्यात मिळाले असे अभिमानाने सांगितले जायचे. त्यावरून सामाजिक प्रतिष्ठा ठरत असे. इतके भयानक वास्तव त्या काळी होते.



दी लेडी बॉस
अर्चना सोंडे

मात्र या कुप्रथेविरुद्ध एक आई, आपल्या मुलीला न्याय देण्यासाठी उभी राहिली. तिला खंबीर साथ मिळाली ती हुंड्यापायी बळी गेलेल्या मुलीची आई असलेल्या शाहजहान आपा यांची. ८०-९० च्या दशकात एका अहवालानुसार १९८७ मध्ये १९०० हुंडाबळी होते. हेच प्रमाण १९९७ मध्ये ६००० झाले. २०११मध्ये तर ८६०० महिला हुंडाबळी ठरल्या. हुंडाबळीच्या प्रमाणाचे एक प्रमुख कारण म्हणजे महिला आणि मुलींना 'ओझे', विशेषतः 'आर्थिक ओझे' म्हणून सतत पहिले गेले. मुलगी वयात आली की तिचं लग्न लावून देणं ही मोठीच जबाबदारी भारतातील पालकांना वाटते. या समस्येवर मात करण्यासाठी, वधूची 'मालमत्ता' घेण्यासाठी वराच्या कुटुंबाला रोख रक्कम, वस्तू किंवा 'भेटवस्तू' स्वरूपात हुंडा देण्याची प्रथा सुरू झाली. तथापि, पती आणि त्याचे कुटुंब लग्नानंतर पत्नी आणि तिच्या कुटुंबावर दबाव आणून आणि गैरवापर करून अधिक वस्तूंची मागणी करतात आणि जे त्यांच्या 'मागण्या' पूर्ण करण्यात अयशस्वी होतात त्यांना हिंसाचार आणि मृत्यूला सामोरे जावे लागते.



१९८० मध्ये सत्यराणीने सुभाष चंद्रा आणि त्याच्या कुटुंबावर कनिष्ठ न्यायालयात खून आणि हुंडाबळीचे आरोप दाखल केले. पोलिसांनी सुभाषचंद्रावर खुनाचा नाही तर हुंडा प्रतिबंधक कायद्याअंतर्गत आरोप लावला. यामुळे सर्वोच्च न्यायालयाने १९८० मध्ये असा निर्णय दिला की चंद्राने स्कूटरची मागणी लग्नाच्या दहा महिन्यांनंतर केली होती, त्यामुळे त्याचा मृत्यूशी संबंध असू शकत नाही. सत्यराणी यांनी खुनाचा खटला सुरू ठेवला; परंतु न्यायालयात खटल्याची सुनावणी होण्यासाठी २००० पर्यंत वेळ लागला. २००० मध्ये सुभाषचंद्राला आत्महत्येस प्रवृत्त करण्याप्रकरणाच्या आरोपात अखेर दोषी ठरवण्यात आले. अपीलवर, २०१३ मध्ये त्याची शिक्षा कायम ठेवण्यात आली आणि त्याला सात वर्षांची शिक्षा भोगण्याचा आदेश देण्यात आला.

१९८० च्या दशकात, जेव्हा हुंडाबळींच्या घटना वाढत होत्या, तेव्हा सत्य राणी चड्ढा यांनी रॅलींमध्ये भाग घेतला आणि या 'प्रथे'चा अंत करण्यासाठी मोहीम राबवली. १९८७ मध्ये घरगुती आणि लैंगिक हिंसाचारातून वाचलेल्यांसाठी शक्ती शालिनीची स्थापना झाली. हिंसाचारातून वाचलेल्यांना न्याय देण्यासाठी दोघांनीही अनेक कायदेशीर आणि सांस्कृतिक लढाया लढल्या. या लढ्याला कालांतराने यश आले.

यापूर्वी, कायद्यानुसार, हुंड्याची व्याख्या 'लग्नासाठी विचार' अशी केली जात होती. १९८३ च्या पहिल्या दुरुस्ती कायद्याने हुंड्याची व्याख्या बदलून लग्नादरम्यान कधीही 'भेटवस्तू' मागणे समाविष्ट केले. क्रूरतेशी संबंधित प्रकरणांना हाताळण्यासाठी भारतीय दंड संहितेत समाविष्ट केलेल्या फौजदारी कायद्यातील सुधारणा अमलात आणण्यात आली. भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ११३ अ मधील दुसऱ्या दुरुस्ती कायद्यात असे म्हटले आहे की, जर विवाहित महिलेचा लग्नाच्या सात वर्षांच्या आत आत्महत्या करून मृत्यू झाला आणि तिच्या पती/सासऱ्यांनी तिला यापूर्वी कोणत्याही प्रकारची हिंसाचार आणि क्रूरता सहन केली असेल तर आत्महत्येस प्रवृत्त करणे गृहीत धरले जाते.

सत्यराणी आणि शाहजहान आपा यांच्या लढ्यामुळे अनेक सासुरवाशीण तरुणींना कायद्याचे संरक्षण मिळाले. दोघांनीही हुंडा वादात आपल्या मुली गमावल्या, त्यांनी न्यायासाठी आणि भारतातील हुंडा प्रथा बदलण्यासाठी दशके एकत्र काम केले. सत्यराणी चड्ढा या भारतातील हुंडाविरोधी चळवळीच्या प्रणेत्या मानल्या जातात. अशी ही लढाऊ आई, सत्यराणी चड्ढा १ जुलै २०१४ रोजी निधन पावली.

भारतातील विवाहित महिलांसाठी त्यांनी अर्ध्याहून अधिक आयुष्य लढण्यात घालवले. त्यांच्यासाठी धैर्य आणि लढाऊ बाण्याचे प्रतीक म्हणून त्या नेहमीच लक्षात राहतील.

## पाणीचं पाणी चहुकडे...

दि वसा कडकडीत ऊन, रात्री गारवा आणि मधल्या वेळेत पाऊस. ऐन वैशाखात अनुभवाला येणारं हे चित्र म्हटलं तर भयावह. एका ऋतुतून दुसऱ्या ऋतूत होणारे स्थित्यंतर आता घडताना दिसत नाही. अचानक आलेल्या तीव्र बदलाला शरीर आणि निसर्ग जुळवून घेत नाही. परिणामी मागे लागतो आरोग्य तक्रारींचा सिलसिला. दुसरीकडे जानेवारीपासूनच जंगलपट्ट्यात पळस फुलणं म्हणजे पर्यावरणाच्या दृष्टीने धोक्याची सूचना, जी निसर्गाचा समतोल ढासळल्याचं दर्शवते. काल-परवापर्यंत उकाड्याने शरीराची काहिली होत असताना, काळजीचा भाग म्हणून लोकांनी पथ्यपाणी पाळा म्हणेपर्यंत, कुठलीही आगाऊ सूचना न देता पाऊस पडला. कमी दाबाचे पट्टे निर्माण करत दाणादाण उडवत, त्याने आपलं अक्राळविक्राळ रूप दाखवायला सुरुवात केली. मे महिन्याच्या पूर्वार्धात पावसाने लावलेल्या हजेरीला या काळातील सर्वाधिक त्रस्त करणारी घटना म्हणता येईल.




मोरपीस
पूजा काळे

सृजनतेचं प्रतीक असलेला पाऊस हा आपला खरा मित्र. त्याने बरसावं, नवचेतना जागवाव्या, आनंद द्यावा घ्यावा. एवढं सोप्प असताना व्याप वाढवत येणाऱ्या पावसाचं मोकळेपणाने स्वागत तरी कसं करावं? त्याचं कोलमडलेलं वेळापत्रक किती वाईट परिस्थिती बघायला लावणारं आहे कुणास ठाऊक...! 'झळा या लागल्या जीवा' म्हणत वेगवेगळ्या ठिकाणी असणारं पाण्याचं दुर्भिक्ष्य, कोरड्या विहिरी, पाणवठे यांची मोजदाद झाली नसताना, वादळासह उच्छाद मांडणारा पाऊस शेतकऱ्यांबरोबर सामान्यांचे तीन तेरा वाजवतोय. जोवर निसर्गाची हाक आपण ऐकत नाही तोवर एक दिवस खरोखर हा निसर्ग आपल्या डोक्यावरील हात काढून टाकेल याची खात्री पटत चाललीयं. बेभरवशाच्या पावसाचा सार्वत्रिक परिणाम अर्थकारणावर होईलचं शिवाय महागाई वाढेल. आज महाराष्ट्रातील अवस्था वाईट आहे. पावसामुळे पीक पाण्याखाली गेल्याने शेतीचं नुकसान झालंय. फळबागा नष्ट झाल्या आहेत. आभाळ फाटल्याचा परिणाम चहूकडे पाण्याचं राज्य घेऊन आलाय.



याची कारणं शोधताना खूप मागे जावं लागेल. महत्त्वाकांक्षेतून क्रांती घडली आणि मर्यादित पातळी ओलांडली गेली. वैश्विक पातळीवर बदलण्याची आस आणि नावीन्याचा ध्यास हा सृष्टीचा स्थायिभाव होता. वैज्ञानिक दृष्टिकोन जपणे हा जग आणि देश प्रगतीपर विचारातील महत्त्वाचा टप्पा होता. विज्ञान विचार यात्रेची चळवळ २१ व्या शतकात झपाट्याने फोफावली आणि मानवी उद्धाराची सर्वोत्तम महत्त्वाकांक्षा राक्षसीवृत्ती दाखवून गेली. मानवाचं निसर्गाशी असलेलं मैत्रीपूर्ण नातं संपुष्टात येताना काही ठळक गोष्टी पुढे आल्या. एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी औद्योगिक क्रांतीचा विकास झाला. जुनं ते हवं आणि नवं तेही हवं म्हणत, विकासाचे मार्ग खुले झाले. उत्पादन कार्य क्षमतेबरोबर, दळणवळणाच्या सोयी वाढल्या. कृषी क्षेत्रात नवीन शोध लागले. शहरीकरणासाठी जंगल कापून टाकण्यात आली. यामुळे तापमानातली वाढ, तर दुसरीकडे ग्लोबल वॉर्मिंगची भीती बळावू लागली. भूकंप, महापूर, वणवा, नदीचा प्रवाह बदलणे, गारा पडणे, अतिवृष्टी, दुष्काळ याचे परिणाम जाणवू लागले. पृथ्वी आणि हवेच्या तापमान प्रणालीत अपेक्षेपेक्षा जास्त चढ-उतार झाल्याने हवामान बदलाचे परिणाम दिसून आले, ज्यामध्ये वनस्पती, शेती, मानव, पाणथळी आणि इतर प्रणाली समूळ नष्ट होण्याची दाट शक्यता निर्माण झाली. येणारा धोका प्रत्येकी वेगळा असू शकतो हे जाणून वेळस्थानानुसार हवामान बदलाच्या संभाव्य धोक्यांवर लक्ष ठेवून कार्यप्रणाली आखायला हवी. मानवप्राणी वन्यजीव, निसर्ग यांना नवनवीन आव्हानांना सामोरे जावं लागतयं.

वादळवारा, उष्णतेच्या लाटा, पाऊस हे प्राणीमात्रांसह, मनुष्य जीवनाचा अंत ठरू पाहत आहेत. वातावरणात वाढलेली कार्बन, मिथेनची वायूपातळी हवामान बदलाचा स्त्रोत आहे. अन्नप्रणाली, पाण्याचं दुर्भिक्ष्य, वाढणारे मृत्यूदर, हृदयविकार, दम्यासारखे आजार, खाण्याच्या सवयी, उत्पादन साखळी यावर अधिक परिणाम होतोय. वाढलेल्या उष्णतेमुळे हवेत कोरडेपणा येऊन वणवा पेटण्याचे प्रसंग ओढवत आहेत. सागरी वाऱ्याच्या दिशा निश्चित असल्या, तरी उष्णता शोषणारे महासागर वातावरणात सरासरीपेक्षा लक्षणीय बदल घडवतात, ज्यामुळे महासागरातलं आम्लीकरण झपाट्याने वाढतयं. कोरल संपुष्टात येताना जमीन नापीक होण्याचे प्रमाण वाढतयं. हवामान बदलावर उपाय म्हणून, झाडांचं जतन-संवर्धन करणं, कृषी उत्पादकता वाढवणं, स्मार्टशेतीचा पर्याय निवडणं, कचऱ्याचा पुनर्वापर, अक्षय ऊर्जा संसाधनांचा वापर, सार्वजनिक वाहतूक करणं, पाण्याचा अपव्यय टाळणं, विजेची बचत करणं या प्रकारे नियोजन केलं तरंच आपण मोकळा श्वास घेऊ, जेणेकरून पुढच्या पिढीला मदत होईल. निसर्गाचा समतोल सावरण्यास प्रत्येकाने हातभार लावला तर जीवन सुखकारक होईल, जो जगण्याचा तारकमंत्र ठरेल. अन्यथा पाणी पिण्यापुरता उपलब्ध न होता पावसाच्या रूपाने हाहाकार माजवेल आणि चहुकडे पाणीचं पाणी भरेल.



डॉ. नारळीकर यांची ओळखच इतकी मोठी होती की देशात कुठेही त्यांना सहज प्रवेश होता. मानाचे स्थान होते. पण वैयक्तिक पातळीवर त्यांनी या गोष्टीचा कधीच लाभ उठवला नाही. इतकेच काय पण, कोणी समोर आले तर नमस्कार करत ते अत्यंत मृदू भाषेत 'मी जयंत नारळीकर' अशी आपली ओळख सांगायचे.

# संशोधक घडवणारा शास्त्रज्ञ

प्रासंगिक

**वरुण भालेराव**
शास्त्रज्ञ

डॉ. जयंत नारळीकर यांचे निधन ही भारतालाच नव्हे तर जगाला धक्का देऊन गेलेली बाब आहे. सरांनी विज्ञानविश्वात महत्त्वपूर्ण योगदान दिलेच, खेरीज आपल्या दर्जेदार साहित्यातून सर्वसामान्यांपर्यंत वैज्ञानिक विचार पोहोचवण्याचेही काम केले. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने अनेकांना प्रेरणा मिळाली. त्यांची शिस्तप्रियता, अचूकतेचा अट्टहास, कोणत्याही विषयावरील चर्चेत भाग घेत नेमके मत मांडण्याची हातोटी नेहमीच लक्षात राहील.

डॉ. जयंत नारळीकर इतर अनेकांप्रमाणे माझ्यासाठीही रोल मॉडेल होते. किंबहुना, मी खगोलशास्त्रामध्ये कार्यरत होण्यामागील प्रेरणास्थान असणारे हे नाव होते, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. त्यांनी 'आयुका'ची स्थापना केली, तेव्हाच आपले काम लोकांपर्यंत पोहोचवण्याकडे लक्ष देण्याचेही ठरवले. म्हणजे या संस्थेत महत्त्वपूर्ण संशोधन करायचे, त्यासाठी लोकांना तिथे आणायचेच, पण त्याचबरोबर सर्वसामान्यांपर्यंत विज्ञान पोहोचवण्यासाठीही धोरणे राबवायची हे त्यांचे धोरण आधीपासूनच निश्चित होते. 'आयुका'च्या ध्येयाचा तो एक भाग होता. त्यामुळे या मार्गानेही संस्था मोठे काम करू शकली.

संस्थेबरोबरच त्यांनी स्वतःच्या विज्ञानविषयक लेखनातून लोकांपर्यंत आपले विचार पोहोचवण्याचा प्रयत्न केला. मराठीमध्ये अनेक लेख, गोष्टी लिहिल्या. या सगळ्यांमुळे पुण्यामध्ये 'आयुका'च्या उपक्रमांची नेहमीच मोठी चर्चा असायची. तिथे विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने असायची, उन्हाळी सुट्टीमध्ये काही खास उपक्रमांची आखणी केली जायची. अशा कार्यक्रमांमधून एवढा महान शास्त्रज्ञ तुमच्यापुढे येतो, त्याला प्रत्यक्ष बघता येते तेव्हा विलक्षण प्रभाव पडणे स्वाभाविक असते. मी तेच अनुभवले. 'आयुका'च्या उपक्रमांमधूनच मी खगोलशास्त्रात पहिले पाऊल ठेवले. त्यांच्याकडे बघतच मोठा झालो. आयुकाच्याच कार्यक्रमांमधून माझ्या मनात या क्षेत्राविषयी आवड निर्माण झाली. इंटर स्कूल ऑलपियाडमधून मी इथे प्रवेश केला आणि खगोलशास्त्राविषयीची आवड दृढ होत गेली. त्यामुळेच आज या क्षेत्रात कार्यरत आहे. अर्थातच डॉ. नारळीकरांमुळे, त्यांच्या कामाच्या प्रभावानेच हे घडू शकले यात शंका नाही. केवळ मीच नव्हे, तर माझ्यासारखे अनेकजण त्यांच्यापासून प्रेरणा घेत इथे आले आहेत. खगोलशास्त्राचा विचार केला तर आज जगात भारताची खास प्रतिमा निर्माण करण्यातही नारळीकर सर आणि त्यांच्या पिढीतील अन्य तज्ज्ञांचा मोलाचा सहभाग मान्य करावा लागेल. त्यांनी देशाला या क्षेत्राची विशेष ओळख करून दिलीच; खेरीज वैज्ञानिक विचार नवीन पिढीपर्यंत अत्यंत प्रभावीपणे पोहोचवले. भारताच्या उंचावलेल्या प्रतिमेमागे हे एक महत्त्वाचे कारण आहे.

डॉ. जयंत नारळीकर यांनी विश्वउत्पत्तीशास्त्र आणि विश्वउत्क्रांती या विषयांमध्ये प्रचंड काम केले. या क्षेत्रातील त्यांचे योगदान वादातीत आहे. त्याचबरोबर 'स्टेडी स्टेट थेअरी'वरही त्यांनी मोठे काम केले. या थेअरीने त्यांना जगभर ओळख आणि प्रसिद्धी मिळवून दिली.

मी 'आयुका'मध्ये कार्यरत झालो तेव्हा ते निवृत्त झाले नव्हते. मात्र मी त्यांच्या विषयात काम करत नसल्यामुळे चर्चा करण्याची, एकत्र काम करण्याची संधी कधी मिळाली नाही. मात्र माझ्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विलक्षण प्रभाव आहे, हे नाकारून चालणार नाही. कारकिर्दीत उत्तुंग उंची गाठूनही जमिनीलगत राहणारा माणूस असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. त्यांच्या साध्या राहणीचे, प्रगाढ बुद्धिमत्तेचे अनेक किस्से आपण ऐकले आहेत.

डॉ. नारळीकर यांची ओळखच इतकी मोठी होती की देशात कुठेही त्यांना सहज प्रवेश होता. मानाचे स्थान होते. पण वैयक्तिक पातळीवर त्यांनी या गोष्टीचा कधीच लाभ उठवला नाही. इतकेच काय पण, कोणी समोर आले तर नमस्कार करत ते अत्यंत मृदू भाषेत 'मी जयंत नारळीकर' अशी आपली ओळख सांगायचे. अपरिचित व्यक्तीशी याच वाक्यानिशी त्यांच्या संभाषणाची सुरुवात व्हायची. त्यांचे हे एक वाक्य समोरच्या कोणत्याही वयाच्या माणसाला आपलेसे करायचे. या वाक्याने त्याच्यावरील ताण नाहीसा व्हायचा आणि संवाद सहजी घडायचा. स्वभाव इतका सौम्य आणि सौहार्दपूर्ण असल्यामुळेच शाळकरी मुलेही त्यांच्याशी सहज बोलू शकायची. शंका विचारू शकायची. आजच्या भाषेत बोलायचे तर त्यांनी कधीच ॲटिट्युड दाखवला नाही. दांडगा जनसंपर्क असण्यामागील हेदेखील एक महत्त्वाचे कारण होते. ते कोणत्याही विषयावर बोलायला तयार असायचे. विशेष म्हणजे प्रत्येक विषयात बोलण्यासाठी त्यांच्याकडे अनेक संदर्भ आणि महत्त्वपूर्ण मुद्दे असायचे. त्यामुळेच त्यांचे बोलणे अत्यंत प्रभावी व्हायचे.

आजही 'आयुका' ही संस्था जयंत नारळीकर या नावाच्या प्रभावाखाली आहे. त्यांनी तिथे संशोधनाला पुरक ठरणारे वातावरण तयार केले. याचा प्रभाव तेथे येणाऱ्या माझ्यासारख्या प्रत्येकाला जाणवतो. इतर विषयातही मोठे योगदान देणे, साहित्यनिर्मिती करून जनसामान्यांपर्यंत आपले विचार पोहोचवणे, देशाला वैज्ञानिक प्रगतीच्या दिशेकडे नेणे हे कामही त्यांनी अत्यंत सहजतेने केले. खगोलशास्त्रातील त्यांचे योगदान याच्या पलीकडे आहेच, पण 'आयुका'सारखी संस्था, वैज्ञानिकांची पुढील पिढी घडवण्याचे कामही आभाळाच्या उंचीचे आहे. त्यांनी हे काम केले नसते तर आज आपण वेगळ्या ठिकाणी असतो.

नारळीकर सरांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले. एखाद्या शास्त्रज्ञाने आपल्या क्षेत्राबरोबरच अन्य प्रांतातही इतके महत्त्वपूर्ण योगदान देण्याचीही कदाचित ही पहिली वेळ असेल. यामागेही भारतात होणारी वैज्ञानिक प्रगती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचाच विचार असावा. असा विचार करणारे द्रष्टे व्यक्तिमत्त्व आता हरपले आहे. नवीन पिढीने त्यांचा वारसा जपला तरच निर्माण झालेली ही पोकळी भरून येऊ शकते. नारळीकर सरांना विनम्र आदरांजली!

अशा या थोर शास्त्रज्ञाच्या निधनामुळे भारताने एक महान शास्त्रज्ञ गमावला आहे. डॉ. नारळीकर यांच्या कार्यामुळे भारतीय विज्ञानक्षेत्राला एक अमूल्य वारसा मिळाला. त्यांच्या योगदानामुळे अनेक पिढ्यांना विज्ञानाची गोडी लागली आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला. त्यामुळेच आता हा वारसा जतन करण्याची जबाबदारी नवीन पिढीवर आहे. त्यांच्या पत्नी गणितज्ञ डॉ. मंगला नारळीकर यांचे २०२३ मध्ये निधन झाले. त्यांनीही गणिताच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले आणि शालेय गणित अभ्यासक्रमाच्या पुनरावलोकनात सक्रिय सहभाग घेतला. हे दांपत्य 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' या उक्तीचे मूर्तिमंत प्रतीक होते. दोघांनीही हयातभर अनेक उपक्रमांमध्ये नवी पिढी घडवण्यात, संस्कारित करण्यात, विज्ञान आणि गणिताची गोडी निर्माण करण्यात मोलाची भूमिका बजावली. डॉ. नारळीकर यांच्या कार्यामुळे भारतीय विज्ञानक्षेत्राला एक वेगळी उंची मिळाली. अनेकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास त्यांच्या अव्याहत सुरू असणाऱ्या कामाचा मोठा वाटा होता. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून येणार नाही.

डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनामुळे भारतीय खगोलशास्त्रज्ञ, विज्ञान लेखक आणि शास्त्रीय विचारसरणीचे प्रबोधन करणारे महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांनी 'क्वासी-स्टेडी स्टेट' सिद्धांत विकसित करून बिग बँग सिद्धांताला आव्हान दिले. या संशोधनामुळे त्यांनी भारतीय आणि जागतिक खगोलशास्त्राच्या क्षेत्रात दिलेले महत्त्वपूर्ण योगदान समस्त विश्वाने मान्य केले. १९८८ मध्ये पुण्यात 'इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी ॲण्ड ॲस्ट्रोफिजिक्स' (आयुका) या संस्थेची स्थापना करून त्यांनी भारतीय खगोलशास्त्राच्या शिक्षणाला एक नवी दिशा दिली. ते २००३ पर्यंत या संस्थेचे संचालक होते. विज्ञानविश्वातील उत्तुंग कारकिर्दीबद्दल त्यांना वेळोवेळी विविध सन्मानांनी गौरवण्यात आले. यामध्ये 'पद्मभूषण' (१९६५), 'पद्मविभूषण' (२००४), 'महाराष्ट्र भूषण' (२०१०), 'कालिंग पुरस्कार' (१९९६), 'ॲडम्स पुरस्कार' (१९६७), 'स्मिथ्स पुरस्कार' (१९६२) आणि 'साहित्य अकादमी पुरस्कार' (२०१४) यांसारख्या अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांचा समावेश आहे. डॉ. नारळीकर प्रसिद्ध शास्त्रज्ञ असण्याबरोबर उत्तम विज्ञान लेखकही होते. त्यांनी 'यक्षांची देणगी', 'वामन परत ना आला', 'अंतराळ आणि विज्ञान' यांसारखी विज्ञानविषयक लोकप्रिय पुस्तके लिहिली. त्यांच्या आत्मकथनपर 'चार नगरातले माझे विश्व'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.

# कोलाज

## निसर्गसंपन्न आणि सुरक्षित शिलाँग



विशेष



**मृणालिनी कुलकर्णी**

भारताच्या ईशान्य भागात स्थित असलेल्या सात भगिनी राज्यांपैकी एक मेघालय! ढगांचे निवासस्थान! येथे ढग जमिनीवर येतात. डोंगरांनी वेढलेले उंच पठार! भौगोलिक आणि जैवविविधतेच्या दृष्ट्या संपन्न! मेघालयाच्या बाजूला आसाम आणि बांगलादेश आहेत. १९७२ मध्ये मेघालय राज्याच्या निर्मितीनंतर मेघालयचे तीन टेकड्यांत विभाजन झाले. खासी टेकडी, गारो टेकडी आणि जैतिया टेकडी.

खासी टेकडीवर वसलेले शहर शिलाँग, हे एक हिल स्टेशन असून मेघालयाच्या नैसर्गिक लँड्स्केपचे प्रवेशद्वारही आहे. मेघालयची राजधानी शिलाँग असून ते सर्वात मोठे, लोकप्रिय आणि पर्यटकांचे आवडते स्थळ आहे.

धुक्यात हरवलेले शिलाँग पाहणे ही एक वेगळीच अनुभूती आहे. फोटो काढेपर्यंत ढग पुढे सरकतात. हिरव्यागार टेकड्या, पाहावे तेथे पाण्याचे कोसळणारे धबधबे, बोटिंगसाठी जलाशय, दऱ्याखोऱ्यांना कमतरता नाही, अनेक विविध प्रजातींच्या झाडांनी घेरलेली जंगले, थंड हवामान म्हणूनच शिलाँगला पूर्वेकडील स्कॉटलंड म्हणतात. याशिवाय साहसी लोकांसाठी हायकिंग, ट्रेकिंग, जंगलातील ट्रेल्स, गाडी चालवणे, संगीत, जोडीला खाणे असे जुन्या आणि आधुनिक, सांस्कृतिकचे मिश्रण आहे. त्यासाठी मुक्काम आवश्यक.

प्राकृतिक सौंदर्याबरोबरच मेघालय - शिलाँगमधील वैशिष्ट्य -१ येथे चुनखडीमुळे सिमेंटची मुबलकता असूनही येथील खासी -आदिवासी लोक कार्बनपासून दूर झाडांच्या जवळ राहतात. या लोकांनी रबराच्या झाडाच्या मुळांपासून तयार केलेली नदी पार करण्यासाठी मजबूत ब्रिज. डबलडेकरसुद्धा. ब्रिज करायला २५ वर्षे लागतात आणि ५०० वर्षे टिकतात. रस्त्यात इतरत्र बांबूचे ब्रिज, बाके, शंकूच्या आकाराचे डस्ट बिन साऱ्या वस्तू झाडापासून केलेल्या. २) येथील खासी लोकांचा वांशिक समूह आहे. भाषा खासी. खासी लोकांचा पारंपरिक 'जैन सेम' हा पोशाख वैशिष्ट्यपूर्ण आहे.

खासी जमातीत महिला प्रधान संस्कृती असून ती घरात कर्ती असते. लग्नानंतर मुलगा मुलीकडे जातो. डोंगरात राहणारे हे खरे गिरिजन. ब्रिटिशानमुळे ते ख्रिश्चन झाले.

३) खासी रहिवाशांना संगीताची प्रचंड आवड. वर्षभर येथे पाश्चात्त्य संगीताच्या मैफली होतात. या रॉक संगीतामुळेच शिलाँग ही भारताची रॉक संगीताची राजधानी आहे. कडक उन्हाळा, गर्दीपासून दूर चलो, - 'निसर्गसंपन्न आणि सुरक्षित शिलाँग.'

एप्रिल अखेर आम्ही चौघेजण विमानाने गुवाहाटीला नातलगांकडे राहिलो. दोन रात्र तीन दिवसांसाठी त्यांनीच पूर्ण प्रवासासाठी गाडी, राहण्याची सोय केली होती. गुवाहाटीपासून शिलाँग १०० किलोमीटरवर. आमच्यासोबत झाडे-डोंगरही पळत होते. थोड्याच वेळांत अतिशय मोठा मानवनिर्मित स्वच्छ पाण्याचा तलाव पाहिला.

उमियम (बारापानी) तलाव. या तलावाला तीन-चार ठिकाणी देखावा पाहण्यासाठी (व्हू पॉइंट) सोय आहे. चारी बाजूने हिरवाई, तलावात बोटिंग, पाण्यातले खेळ खेळले जातात. या पाण्यावर धरण बांधून जलविद्युतकेंद्र उभारले आहे. तलावाभोवती गाडीने फेरी मारणे हा एक सुखद अनुभव. पर्यटकांसाठी, कुटुंबासाठी आनंदायी विकसित असा हा उमियम तलाव. वाटेत मोकळ्या परिसरातील वाह काबा धबधबा पाहिला.

शिलाँग पर्यटनातील प्रसिद्ध स्थळ 'एलिफंट फॉल्स'. तीन स्तरीय धबधब्याचे सौंदर्य पायऱ्या असलेल्या पुलामुळे आम्ही सर्व बाजूने पाहिला. सुरुवातीलाच झाडामध्ये पहिला धबधबा जरा दुरूनच पाहिला. काही पायऱ्यांनंतर कठड्याजवळून दुसरा दिसतो. अंदाजे एकूण १०० पायऱ्या उतरल्यानंतर तिन्ही टप्प्यातले पाणी अखंड प्रवाहाने पायथ्याशी असलेल्या हत्तीच्या आकारासारख्या दगडावर पडून उडणारे तुषार अंगार अनुभवले. हा जलप्रपात जवळून पाहतो. आता दगडाचा आकार हत्तीसारखा राहिला नाही. पडलेल्या पाण्याचा जलाशय, तेथील मोठे मोठे दगड, पाण्यांत चालायला... मस्त.

मेघालय हे गुहा प्रणालीचे घर आहे. सर्वत्र धबधबे पाहताना चेरापुंजीच्या मार्गातील 'आरवाह गुहा' बघितली. येथे थोड्या पायऱ्या, थोडे सरळ असे अर्धा तास चालणे आहे. चुनखडी आणि जीवाष्मासाठी प्रसिद्ध असलेली ही एक विशाल गुहा आहे. आत प्रकाश आहे तरी टॉर्च असल्यास उत्तम. कारण पृष्ठभाग असमान, उंची कमी आहे तरी धोका नाही. सर्व वयोगटातील लोक जात होते.

ढगांच्या निवासस्थानातील सर्वात उंच असा 'नोहाकालिका धबधबा'. एका बाजूने लांबवर पसरलेला डोंगराचा पट्टा, वरती गर्द हिरव्या झाडामुळे पाण्याचा उगम दिसत नाही. दोन-तीन कडेकपारीतून पाणी खोलवर दरीत पडताना पाहत असताना, दुसरीकडे तिन्हीसांजेच्या सूर्यास्ताचेही आम्ही साक्षीदार झालो.

दुसऱ्या दिवशी स्फटिकासारखे पारदर्शक स्वच्छ पाण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या मेघालयमधील डावकी नदीवर गेलो. पर्यटकांची बोटिंगसाठी प्रचंड गर्दी. सुरुवातीपेक्षा बोट जसजशी पुढे जाते तसे खरोखर पाण्याचा खालचा तळ स्पष्ट दिसतो. दोन्ही बाजूला प्रचंड मोठे दगड, त्यावर हिरवी झाडे, काही घरे, समोरच खासी आणि जैतिया पर्वतांना जोडणारा ब्रिटिशकाळांतील कर्षण सेतू. समोरून जाणाऱ्या गाड्या पाहत निसर्ग टिपून घेतला. अर्थजनासाठी हे ठिकाण तेजीत. नदीच्या पाण्याच्या बाहेर पसरलेल्या दगडातून एक रेघ भारत आणि बांगलादेशाला वेगळी करते. हीच भारत-बांगलादेशाची सीमा होय. भारतीय रक्षक आपल्याला तिकडे जाऊ नका असे सांगतात. या नदीमार्गे रोजगारासाठी ये-जा करणारे बांगलादेशी पाहिले. बांगलादेशीय भारतात येतात हे वाचलेले आठवले. डावकी आणि एशियातील सर्वात स्वच्छ गाव मावलयनॉन्ग ही दोन्ही गावे भारत-बांगलादेशच्या सीमेवर आहेत. डावकी नदी (उमंगोट) डावकी आणि मावलयनॉन्ग गावातून जैतिया आणि खासी पर्वतरांगांमधून पुढे बांगलादेशात जाते. डावकीच्या जवळ काही अंतरावर भारत आणि बांगलादेशाची सीमा पाहिली. तिथे आपल्या सरहद्दीत आपला आणि त्यांच्या सरहद्दीत त्यांचा ध्वज फडकत होता. आपला भारताचा तिरंगा पाहताना गलबलून आले. आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्रासाठी 'सुतारकोडी' ही भारत-बांगलादेशाची आंतरराष्ट्रीय सीमा आहे. तेथे भारताचे प्रमुख चेक पोस्ट आहे. येथे अर्धा दिवस जातो.

मावलयनॉन्ग या स्वच्छ गावात थोडेचं फिरलो. त्याआधी एके ठिकाणी जिवंत झाडाच्या मुळापासून तयार झालेल्या ब्रीजवरून चाललो. निसर्गाची जादू अनुभवली. बाजूला पाण्याचा धबधबा. तेथे ट्रेकिंगसाठी जवानांची टूर आली होती.

तिसऱ्या दिवशी शिलाँगमध्ये असलेल्या काही चर्चपैकी सर्वात मोठे आणि प्रसिद्ध 'मेरीचे कॅथड्रेल चर्च' या शांत परिसरास भेट दिली. या चर्चची निळ्या रंगाची छटा (मेघालय नावाला साजेसा) लक्ष वेधून घेते. सकाळची वेळ व्यायाम, योगा, चालणे, ओपन जिम, मुलांसाठी खेळ अशा सर्वांसाठी विचारपूर्वक आखणी केलेले सुंदर 'वॉर्ड्स लेक'. येथे बोटिंग बंद आहे. पाण्यात छोटे मासे पाहिले. विविध प्रकारच्या वेगवेगळ्या रंगातील फुललेल्या फुलांनी सकाळ प्रसन्न केली. बागेचा आकार घोड्याच्या नालेसारखा. मध्यभागचा लाकडी पूल नजर खेचून घेतो.

शांत वातावरणातून खूप गर्दी, गजबजलेल्या भागाकडे गेलो. शिलाँगची प्रमुख बाजारपेठ, प्रमुख खरेदी केंद्र खाण्यासाठी हॉटेल्स, राहण्यासाठी होम स्टे, गेस्ट हाऊस, हॉटेल्स, सारे उपलब्ध असलेला 'पोलीस बाजार'. आम्ही येथे थोडा खाण्याचा स्वाद घेतला. ईशान्यकडील सात राज्यांच्या संस्कृतीचे पंरपरेचे प्रतीक असलेले सात मजली 'डॉन बास्को म्युझियम '. अतिशय अभ्यासपूर्ण, भव्य. सहज दोन तास लागतात. सर्वात वरती गोलाकार सुरक्षित टेरेसवरून (स्काय वॉक) फेरी मारताना परत पूर्ण शिलाँग पाहतो. जाता जाता शिलाँगचे सर्वोच्च शिखर 'शिलाँग पीक '. येथे भारताच्या हवाई दलाचे रडार स्टेशन असल्याने इतर वाहने ठरावीक अंतरानंतर आत येऊ शकत नाहीत. थोड्या अंतरासाठी टॅक्सीची सोय आहे. "आय लव्ह शिलाँग" ही खास फोटोची जागा. टेरेससारखा मोठा कॅरीडॉर, दोन्ही बाजूला निरीक्षण टॉवर. शिलाँगचे परत पूर्ण दर्शन! संपूर्ण शिलाँग प्रवासांत प्रत्येक ठिकाणी प्रवेश शुल्क आहे. सतत फिरताना फुलझाडांनी फुललेले झाड पाहताना घरात केर काढण्यासाठी वापरतो तो झाडू म्हणजे एका फुलझाडाच्या फांद्यांपासून बनवलेला! हा विचारच मनात शिवला नव्हता. असो.


**असे हे निसर्ग संपन्न आणि सुरक्षित शिलाँग!**

mbk1801@gmail.com

# थोर विचारवंत पांडुरंगशास्त्री आठवले...



कोकण आयकॉन



**सतीश पाटणकर**

योगेश्वर कृषी, वृक्षमंदिर, मत्स्यगंधा, घरमंदिर अशा एकापेक्षा एक विलक्षण सामाजिक उपक्रमांचे यशस्वी शिल्पकार, स्वाध्याय परिवाराचे प्रणेते, तत्त्वज्ञान विद्यापीठाचे संस्थापक, थोर विचारवंत, तत्त्वचिंतक पांडुरंगशास्त्री वैजनाथशास्त्री आठवले यांचा जन्म कोकणातील रायगड जिल्ह्यातील 'रोहा' येथे वेदशास्त्रसंपन्न घराण्यात झाला. त्यांचे वडील रोहे येथे सरस्वती संस्कृत पाठशाळा चालवीत होते. या पाठशाळेत पांडुरंगशास्त्री यांचे वडिलांपाशीच प्रारंभिक शिक्षण झाले. दादांच्या आईचे नाव पार्वती होते. आजी सरस्वतीबाईंचा छोट्या पांडुरंगवर विशेष जीव होता. आजीचे निधन झाल्यानंतर वैजनाथशास्त्री रोह्याहून मुंबईस स्थलांतरित झाले. त्यांनी मुंबईच्या गिरगाव भागात माधवबाग येथे पाठशाळा सुरू केली आणि याच पाठशाळेत दादांचा भारतीय दर्शनशास्त्रे, वेदान्तासह भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास झाला.

दादा एकपाठी होते. वाचनाची, अभ्यासाची उपजत आवड यामुळे अल्पकाळातच त्यांचा विद्याव्यासंग इतका दांडगा झाला की, अनेक थोर अभ्यासक थक्क होऊन जात. मराठी, संस्कृत, गुजराती, इंग्रजी, हिंदी अशा अनेक भाषांवर त्यांनी प्रभुत्व संपादन केले होते. वयाच्या केवळ बाविसाव्या वर्षी, १९४२ मध्ये त्यांनी वडिलांच्या आज्ञेने भगवद्गीतेवर पहिले प्रवचन दिले आणि त्यांच्या वाग्यज्ञाचा श्रीगणेशा झाला. त्यांनी एका नव्या दृष्टिकोनातून, नव्या समाजाला सहज पटेल, आवडेल अशा शब्दांत आपले विचार मांडले. भक्तीला सामाजिक शक्तीचे रूप दिले.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शांतता, सलोख्याच्या हेतूने १९५४ साली जपान येथे झालेल्या जागतिक तत्त्वचिंतक परिषदेसाठी पांडुरंगशास्त्री यांना विशेष निमंत्रित केले गेले. तेथे त्यांनी 'कृष्णम् वंदे जगद्गुरू' या विषयाद्वारे भारतीय अवतार कल्पनेवर आपले उदात्त, व्यापक विचार मांडून सर्वांना प्रभावित केले. त्यांची विद्वत्ता, मानव कल्याणाची उदात्त, व्यापक भूमिका आणि नवा दृष्टिकोन अमेरिकन तत्त्वचिंतकांना इतका भावला की, त्यांनी अमेरिकन नागरिकत्वाचा प्रस्ताव दादांपुढे ठेवला; पण दादांनी भारतभूमीत राहूनच कार्य करण्याचा आपला मनोदय ठामपणे व्यक्त केला.

१९५५ साली दादांनी 'स्वाध्याय परिवार' या कल्पनेला मूर्त रूप देण्याच्या दृष्टीने एकोणीस स्वाध्यायींना सौराष्ट्रात पाठविले आणि कार्यारंभ केला. 'भक्तिफेरी' असे या अभियानास नाव दिले गेले. आता या स्वाध्यायींची संख्या कित्येक लाख झालेली आहे. 'स्व'ला ओळखा, दुसऱ्यांच्या 'स्व'चा आदर करा, तेजाची पूजा करा, प्रेमभाव जपा, स्वतःला दुर्बल, शूद्र समजू नका, आपल्या हृदयस्थ देवत्वाला ओळखून आत्मगौरव संपादन करा, असे सांगत स्वाध्याय परिवाराचे हे कार्य दादांनी मराठी एवढेच गुजराती बांधवांमध्ये, तेही आदिवासी, कोळी या समाजामध्ये मोठ्या आत्मीयतेने रुजविले. त्यांनी महिन्यातील एक दिवस देवासाठी, समाजासाठी समर्पित भावाने कार्य करण्यास स्वाध्यायींना शिकविले व भक्तीला पूजापाठापलीकडे नेऊन सामाजिक कार्याचा आशय प्राप्त करून दिला. यातून 'योगेश्वर कृषी', 'मत्स्यगंधा' अशा उपक्रमांचा प्रारंभ झाला व ते अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी झाले. स्वाध्याय परिवाराचे कार्य पाहून खुद्द विनोबा भावे यांच्यासारखे भूदान चळवळीचे प्रणेतेही चकित झाले व त्यांनी स्वतःहून पांडुरंगशास्त्रींची भेट घेऊन स्वाध्याय परिवाराच्या कार्याचे सूत्र समजून घेतले. 'स्व'चा आत्मगौरव करीत परस्पर भेद, द्वेष विसरून प्रेमाने माणूस माणसाजवळ आणण्याचा स्वाध्याय हा एक बुद्धिगम्य मार्ग आहे, असे दादांनी त्यांना सांगितले. या दरम्यान पांडुरंगशास्त्री यांनी ठाणे येथे तत्त्वज्ञान विद्यापीठाची स्थापना केली. या विद्यापीठाचे वेगळेपण लक्षात घेऊन भारताचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी ठाण्याला भेट देऊन तत्त्वज्ञान विद्यापीठाची पाहणी केली व दादांचे विशेष कौतुक केले.

दादांनी या विद्यापीठातील अभ्यासक्रमाच्या विदेशांतही शाखा उघडल्या. हिंदू धर्मासह ख्रिश्चन, इस्लाम, हिब्रू अशा विविध धर्मांचा निकोप दृष्टीने अभ्यास करून मग तुलनात्मकदृष्ट्या हिंदुधर्म विचार किती श्रेष्ठ, उदात्त, व्यापक आहे हे विदेशांतील विद्यार्थ्यांना स्वतःच्याच अभ्यासाद्वारे त्यांनी जाणवून दिले.

गुजरात, राजस्थानच्या सतत अवर्षणग्रस्त भागांत स्वाध्यायींनी तेथील गावकऱ्यांना बरोबर घेऊन श्रमदानाने ३०० तळी खोदली व पाण्याचा बिकट प्रश्न सोडविण्यात आपले कृतिशील योगदान दिले. तसेच माधववृंद आदी उपक्रमांद्वारे दरवर्षी लाखो झाडे लावून ती चांगली जगविण्याची दक्षताही घेतली.

१९८६ साली दादांनी उत्तर प्रदेशातील गंगा-यमुनेच्या संगमस्थळी, प्रयाग येथे 'तीर्थ मिलन' महामेळावा घेतला. या मेळाव्यास तीन लाख स्वाध्यायी सहभागी झाले होते. या मेळाव्याच्या सर्व व्यवस्था स्वाध्यायींनी स्वतः श्रमदानाने निर्माण केल्या होत्या, तर २००१ साली दादांच्या सहस्रचंद्रदर्शनाच्या निमित्ताने गुजरातमध्ये पंधरा लाख स्वाध्यायींचा महामेळावा झाला होता.

दादांची ग्रंथसंपदाही भारतीय विचारांचे, चिंतनाचे उदात्त दर्शन आहे. 'संस्कृती पूजन', 'दशावतार', 'वाल्मिकी रामायण', 'श्रीकृष्ण जीवनदर्शन', 'श्राद्ध' (भाग १-२), 'ऋषिस्मरण' इत्यादी अनेक विचारगर्भ पुस्तके लिहून दादांनी भारतीय ऋषिचिंतनाचे तेज व ओज दाखवून दिलेले आहे. दादांची वाङ्मय संपदा हे मराठीचे अक्षर वैभव आहे.

दादांनी भारत सोडून अन्यत्र अमेरिका, इंग्लंड या देशांत जाऊन स्थायिक होण्याचे नाकारले, यात त्यांची राष्ट्रनिष्ठा दिसते. तरीपण, त्यांनी अनेक देशांमध्ये स्वाध्याय परिवाराचे कार्य DAY-'डे' (Divine Association of Yogeshwar) अशी संस्था स्थापन करून विस्तारलेले आहे. अनेक देशांत त्यांच्या 'भक्तिफेरी'ने चांगलीच जागृती केलेली आहे. दादांचे कार्य पुरस्कारासाठी नाही, तरी त्यांच्या कार्याचा विविध संस्था, संघटनांनी राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरव केलेला आहे. 'महात्मा गांधी सेवा' पुरस्कार, 'लोकमान्य टिळक' राष्ट्रीय पुरस्कार यांबरोबरच त्यांना 'रेमन मॅगसेसे' पुरस्कारही मिळालेला आहे. 'मनुष्य ही ईश्वराची सर्वोत्कृष्ट निर्मिती आहे, तिचा गौरव करा' या दादांच्या बोधामुळेच त्यांचा जन्मदिवस 'मनुष्य गौरव दिन' म्हणून स्वाध्यायी देशभर, विदेशांत साजरा करतात. २००३ मध्ये दिवाळीच्या प्रकाशोत्सवात लक्ष्मीपूजनाच्या दिनी दादांनी आपली इहलोकीची यात्रा संपविली. त्यांच्या कन्या सुश्री धनश्री तळवलकर या दादांचा वसा व वारसा पुढे चालवीत आहेत. स्वाध्याय परिवाराचे कार्य वर्धिष्णू होत आहे.

# धुवाधार पावसामुळे त्रेधातिरपीट

**अस्मानी** | **रविवारचा आठवडी बाजार पाण्यात**

पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:रविवारी दुपारनंतर कडा परिसरात धुवाधार पावसाने हजेरी लावली. पावसाचा जोर प्रचंड असल्याने रविवारच्या आठवडी बाजाराचा पुरता बोजवारा उडाला. रस्त्यावर चिखल, पाणी साचल्यामुळे बाजारात पालेभाज्या फळे विक्रेत्यांसह व्यापारी, ग्राहकांची पावसामुळे अक्षरशः त्रेधातिरपीट उडाली.

मागील आठवड्यापासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने दमदार तडाखा दिल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यातच आष्टीसहीत कड्यात रविवारी मोठा आठवडी बाजार भरत असतो.

आष्टी, कडा परिसरातील वीस ते पंचवीस गावातील पालेभाज्या फळे विक्रेते, व्यापारी, नागरिक खरेदी, विक्रीसाठी आष्टी, कड्यात येत असतात. परंतु याच रविवारच्या दिवशी दुपारनंतर नेहमीप्रमाणे धुवाधार पावसाने आठवडी बाजारातच हजेरी लावली. पावसाचा जोर इतका प्रचंड होता की, काही क्षणात आठवडी बाजारात रस्त्यावर चिखल, पाणी साचल्यामुळे पसारा आवरता आवरता बाजारकरूंची मोठी तारांबळ उडाल्यामुळे आठवडी बाजाराचा पावसाने पुरता बोजवारा उडाला आहे.



**विक्रेत्यांचा हेकेखोरपणा:** कडा शहरात भाज्या, फळे विक्रेत्यांची गैरसोय लक्षात घेऊन आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नातून पंचवीस ते तीस लाख रुपये खर्चून बाजारतळावर विक्रेत्यांसाठी ओटे बांधण्यात आले. परंतु भाजी विक्रेते या ओट्यावर न बसता रस्त्यावर भाजीपाला विक्री करतात. त्यामुळे लाखो रुपये खर्चून बांधलेले ओटे काही विक्रेत्यांच्या हेकेखोरपणामुळे सध्या निरोपयोगी धुळखात पडले आहेत.

## मोहखेडमध्ये गुणवंतांचा गुणगौरव

**कार्यक्रम:**उपस्थित राहण्याचे संयोजन समितीचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड: चला विद्यार्थी घडवूया, या टॅगलाईनखाली गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा गुणगौरव सोहळा धारुर तालुक्यात येत असलेल्या मोहखेड येथे गुरुवार (दि.२९) मे रोजी सकाळी १० वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ यांनी केले आहे.

विद्यार्थ्याच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी, त्यांना त्यांच्या यशाचा योग्य मार्ग कळावा. यासाठी दरवर्षी इयत्ता १० वी, १२ वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले तर अध्यक्षस्थानी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे अध्यक्ष संदीप उपरे असणार आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून धारुरचे तहसीलदार श्रीकांत निळे, पोलीस निरीक्षक आनंत जाधव, उपप्राचार्य रमेश सोनटक्के, प्रा.रमेश सोनवळकर,डॉ.किरण चक्रे, वंचितचे उपजिल्हाध्यक्ष सचिन उजगरे, वंचितचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, धम्मपाल उघडे, ड.राजेश शिंदे, डीपीआय जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे, मुख्याध्यापक संदिप कापसे, ड.तेजस वडमारे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यास उपस्थित रहावे. असे आवाहन संयोजन समितीकडून करण्यात आले आहे.

## तांदळा येथील आंदोलनाला पाठिंबा

**तत्पर:** उद्धव मडकेंची आंदोलनास्थळी भेट



पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:जायकवाडी धरणातून उपकालवा करुन तो राष्ट्रीय महामार्ग क्र.-६१ च्या बाजूने करण्यात यावा, जेणेकरून शेती सिंचनाचा प्रश्न कायमचा मार्गी लावावा, यासह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी गेवराई तालुक्यातील तांदळा येथे अजय पाटील साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि.२५ मे रोजी पासून आमरण उपोषण करण्यात येत आहे. दरम्यान या आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी शिवसेनेचे गेवराई तालुका प्रमुख उध्दव मडके यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला. तसेच शेतकऱ्यांच्या मागण्यासंदर्भात शिवसेनेच्या वरिष्ठांना माहिती देऊन ते प्रश्न कसे मार्गी लागतील याबाबत पाठपुरावा देखील करु, असा विश्वास त्यांनी यावेळी आंदोलकांना दिला.

गेवराई तालुक्यातील दक्षिण भाग हा कायम दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. या दुष्काळी भागात दरवर्षी उन्हाळा लागताच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होती. या दुष्काळी भागात कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जायकवाडीच्या कालव्यातून उपकालवा करुन दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पाणी द्यावे, या मागणीसाठी १४० गावातील शेतकरी मागील काही महिण्यांपासून लोकलढा सुरु आहे. दरम्यान अजय पाटील साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली तांदळा येथे रविवार दि.२५ मे रोजी पासून आमरण उपोषण सुरु केले असून त्यांनी नदी जोड प्रकल्प करून धरण, नदी, नाले, ओढे, पाटात पाणी सोडावे व ज्याठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी पाट काढण्यात यावे, त्यामुळे कायम स्वरूपी मराठवाडयासह महाराष्ट्रील शेती सिंचणाचा प्रश्न मार्गी लागेल, स्वामीनाथन आयोगच्या शिफारशी प्रमाणे शेतीमालाला दिडपट हमीभाव द्यावा, एक रुपयात पिक विमा हि योजना चालुच ठेवावी, गोवंश कायद्यात » पान २ वर

## मोहखेडमध्ये गुणवंतांचा गुणगौरव

कार्यक्रम:उपस्थित राहण्याचे संयोजन समितीचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: चला विद्यार्थी घडवूया, या टॅगलाईनखाली गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा गुणगौरव सोहळा धारुर तालुक्यात येत असलेल्या मोहखेड येथे गुरुवार (दि.२९) मे रोजी सकाळी १० वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ यांनी केले आहे.

विद्यार्थ्याच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी, त्यांना त्यांच्या यशाचा योग्य मार्ग कळावा. यासाठी दरवर्षी इयत्ता १० वी, १२ वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले तर अध्यक्षस्थानी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे अध्यक्ष संदीप उपरे असणार आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून धारुरचे तहसीलदार श्रीकांत निळे, पोलीस निरीक्षक आनंत जाधव, उपप्राचार्य रमेश सोनटक्के, प्रा.रमेश सोनवळकर,डॉ.किरण चक्रे, वंचितचे उपजिल्हाध्यक्ष सचिन उजगरे, वंचितचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, धम्मपाल उघडे, ड.राजेश शिंदे, डीपीआय जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे, मुख्याध्यापक संदिप कापसे, ड.तेजस वडमारे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यास उपस्थित रहावे.असे आवाहन संयोजन समितीकडून करण्यात आले आहे.

## सैन्यातील निवृत्तीनंतर झेडपीत सेवा

**ऋणानुबंध:**उमाप यांचा ३० ला सेवापूर्ती कार्यक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी



राहुरी:अहमदनगर जिल्हा परिषदेतील परिचर पदावर कार्यरत असलेले निवृत्त सैनिक लहानु मारुती उमाप हे येत्या ३० मे रोजी जिल्हा परिषदेतील परिचर ह्या पदावरून सेवानिवृत्ती होणार असुन जिल्हा परिषदेच्यावतीने सेवापूर्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २९ मे १९८४ ला भारतीय सैन्यातील महार रेजिमेंट मध्ये लामर येथे सेवेत दाखल झाले होते भारतीय सेना दलात कार्यरत असताना १९८७ रोजी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कार्यकाळात श्रीलंका येथे आपसी युद्ध चालू झाले होते आतंकवाद संपवण्यासाठी भारतीय लष्कराने शांतिसेना पाठवण्यात आली होती त्यामध्ये उमाप यांचा समावेश होता भारतीय सैन्यातून सन २८ फेब्रुवारी २०१९ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर सन २००५ रोजी अहमदनगर जिल्हा परिषद मध्ये ते परिचर पदावर रुजू झाले या काळखंडात त्यांनी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर संघटनेचा कार्याध्यक्ष ,सचिव खजिनदार आधी विविध पदे यशस्वीरित्या भूषवली व त्या पदाच्या माध्यमातून जिल्हाभरातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून प्रशासकीय पातळीवर त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले.

जिल्हा परिषद मध्ये कारगित असताना त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्राजक्ता लवंगारे » पान २ वर

## शिवद्रोही भिडेवर गुन्हा दाखल करा

**निवेदन:**शिवप्रेमी,शिवसेना उबाठा गटाची मागणी

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:छत्रपतींचा अपमान करणाऱ्या वाचाळविर संभाजी भिडेवर शिवद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करा, अशी मागणी शिवप्रेमी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक, इतिहासाचे मार्गदर्शक तथा राष्ट्रीय मराठवाडा इतिहास परिषदेचे अध्यक्ष प्रो.डॉ. गोपाल बछीरे, तालुकाप्रमुख ड.दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव सर यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन लोणार येथे फिर्याद देऊन गुन्हा दाखल होण्यासाठी आंदोलन केले.




छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह अनेक महामानवांविषयी संभाजी भिडे या विकृत व्यक्तीने यापूर्वीही वादग्रस्त वक्तव्य केलेले आहेत, छत्रपती शिवाजी महाराज संपूर्ण देशाचे आराध्य दैवत आहे, त्यांचा इतिहास व व्यवस्थापनाचे धडे संपूर्ण जगातील विद्यापीठात शिकविले जाते, ०६ जूनला महाराजांचा राज्याभिषेक सोहळा असतो आणि स्वराज्याची राजधानी रायगडावर तो भव्य प्रमाणात दरवर्षी' लाखो शिवप्रेमींच्या उपस्थितीत साजरा होत असतो. कोल्हापूर येथे ६ जून हा राज्याभिषेक सोहळाच नामशेष करून टाकला पाहिजे असे निर्लज्ज वक्तव्य करणाऱ्या वाचाळवीर, मनोविकृत व शिवद्रोही संभाजी भिडे याच्यावर शिवद्रोहाचा गुन्हा दाखल करून ताबडतोब अटक झाली पाहिजे अशी मागणी शिवप्रेमी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक, इतिहासाचे मार्गदर्शक तथा राष्ट्रीय मराठवाडा इतिहास परिषदेचे अध्यक्ष प्रो.डॉ. गोपाल बछीरे, तालुकाप्रमुख एडवोकेट दीपक मापारी शहर प्रमुख गजानन जाधव शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी शहर संघटक तानाजी मापारी, विभाग प्रमुख गोपाल मापारी, अल्पसंख्याक तालुकाप्रमुख अशपाक खान, अल्पसंख्यांक शहरप्रमुख इकबाल कुरेशी, अल्पसंख्यांचे फहीम खान, विभाग प्रमुख तानाजी अंभोरे, ज्ञानेश्वर दूधमोगरे, युवा शहरप्रमुख श्रीकांत मादनकर, युवा तालुकाउपप्रमुख अमोल सुटे, विजय घोडके मंगेश मोरे » पान २ वर

## तीर्थक्षेत्राची जागा मोकळी करा!

**चर्चा:**प्रशासनान झोपेचं सोंग घेऊन गप्प

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे तीर्थक्षेत्र परीसरात मोठी अडचण निर्माण झाली आहे तरी ग्रामस्थांना काय करायचे ते समजत नाही तरी केज तहसीलदार साहेब राकेश गिट्टे साहेब यांनी श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील जागा खाली करून देण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे कारण श्री संत नामदेव महाराज म्हणजे ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या देवाच्या सप्ताहाच्या ठिकाणी गावातील काही समाज कंठकांनी ऐन सप्ताहाच्या ठिकाणी मोठी अडचण निर्माण केली आहे तरी सप्ताहाच्या ठिकाणची अडचण श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसर सोडुन दुसरी कडे कुठल्याही जागी स्थापन करण्यात यावी परंतु तीर्थक्षेत्र परीसर सोडुन असे गावातील ग्रामस्थांचे धोरण आहे तरी केज तहसीलदार साहेब यांनी जातीने लक्ष घालून श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील सप्ताहाच्या ठिकाणी अडथळा निर्माण केला आहे तो दुर करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

## परळीमध्ये फुले चित्रपटाचा शो



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:महात्मा जोतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित 'महात्मा फुले' चित्रपटाचे प्रदर्शन परळी येथील श्रीनाथ चित्रमंदिर येथे झाले. महात्मा जोतीबा फुले यांच्या क्रांतीचा इतिहास नव्या पिढीला समजावा या सामाजिक हेतूने या चित्रपटाचे दि.२५ मे २०२५ रोजी आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्रीकांत इंगळे, इंजि.भगवान साकसमुद्रे, नाथ चित्रमंदिरचे प्रभारी संचालक नितीन इंगळे आणि संगीता साकसमुद्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## तपोनिमगावात अवैध वाळू उपसा

**चर्चा:** प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

पुण्यभूमी प्रतिनिधी



तलवाडा:गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या तपोनिमगाव गोदावरी नदीच्या पात्रातून दररोजच दिवसरात्र केणी(लारी) या यंत्राच्या साह्याने खुलेआमपणे अवैधरीत्या वाळू तस्कर वाळू उपसा करत असल्याचे दिसून येत असून या कडे कोणीच गांभीर्यपूर्वक पाहत नसल्याने , याबाबत ग्रामस्थातून ओरड ऐकायला मिळत आहे. गेल्या काही महिन्यापासून गोदामातेला विश्रांती मिळाली होती. परंतु पुन्हा गेवराई तालुक्यातील वाळू माफिया अवैध वाळू उपसा करण्यासाठी सक्रिय होताना दिसत आहे.

वाळू माफिया कधी दिवसा तर कधी रात्रीच्या वेळी वाळू उपसा करत असून याकडे संबंधित महसूल प्रशासन कानाडोळा करत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून चोरट्या मार्गाने वाळू वाहतूक वाळूचा गोरखधंदा तपोनिमगाव » पान २ वर

**कार्यक्रम** | **गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा**

## शनैश्वर जन्मोत्सवात समारंभ

पुण्यभूमी/प्रतिनिधी

परळी:येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी, श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्ट, शनैश्वर प्रतिष्ठान, तेली युवक संघटना, शनैश्वर महिला मंडळ, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने १० व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थी व स्पर्धा परिक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या गौरव समारंभ व शोभायात्रेतील मुलांच्या बक्षीस वितरणाचे आयोजन रविवारी (ता.२५) करण्यात आले होते. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.



कार्यक्रमास अध्यक्ष विठ्ठल आप्पा चौधरी प्रमुख पाहुणे सहाय्यक अभियंता अमृता लखापती, संजय लखापती, श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त राजाभाऊ शिंदे, व्यवस्थापक चंद्रकांत उदगीरकर, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, कोलूघाणा सोसायटीचे उपाध्यक्ष सुर्यकांत व्यवहारे, शनैश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवशंकर जठार, तेली युवक संघटनेचे अध्यक्ष पवन फुटके आदि उपस्थित होते. श्री शनी मंदिर सभागृहात आयोजित कार्यक्रंगमाच्या सुरुवातीला संत संताजी जगनाडे महाराज व श्री मन्मथस्वामींच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. मान्यवरांचा शाल,श्रीफळ, स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यावेळी स्पर्धा परीक्षा व १०, १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृती चिन्हे, प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. तसेच शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेत लहान मुलांसाठी वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, या स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संपूर्ण बक्षीसे तेली युवक संघटनेच्या वतीने देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविण » पान २ वर

## सोनवणे तुमच्या शाळेतील शिक्षक आवरा?

**बोंबला:**विद्यार्थ्यांना धडे द्यायचे सोडून करताहेत राजकारण

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:केज तालुक्यातील काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष युवा नेते राहुल भैय्या सोनवणे यांच्या शाळेतील शिक्षक राजकारण,समाज कारण करत आहेत त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे तसेच त्यांच्या शाळेतील शिक्षक जातीपातीचे राजकारण करत आहेत तरी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांनी त्यांच्या शाळेतील शिक्षकांना आवर घातला पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे कारण अनेक नागरिक राहुल भैय्या सोनवणे यांच्या कड बघुन गप्प बसले आहेत परंतु त्यांच्या शाळेतील शिक्षकांना भान राहीलेले नाही त्यांचे जातीपातीचे राजकारण करण्यात व्यस्त आहेत तरी नागरिकांन मध्ये असे चर्चा सत्र सुरू झाले आहे की राहुल भैय्या सोनवणे यांनी त्यांच्या शाळेतील शिक्षक काय जातीपातीचे राजकारण करण्यासाठी शिक्षक म्हणून घेतले आहेत का राजकारण करण्यासाठी शिक्षक म्हणून घेतले आहेत जर संस्थाचालकाचे शिक्षक ऐकत नसतील तर असे शिक्षक शाळेत घेतले कशाला तरी राहुल भैय्या सोनवणे यांनी त्यांच्या शाळेतील शिक्षकांना आवर घातला पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.